cmyk

## संपादकीय

### घाबरवणाऱ्या, भ्रामक कल्पना येतात तरी कशा !

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचे मतदान पार पडले, आता दुसऱ्या टप्प्याची तयारी सुरू आहे. पहिल्या टप्प्यात कमी मतदान झाले, मतदानाची टक्केवारी घसरली परंतु निवडणूक प्रचार घसरला नव्हता. सर्वच पक्षांनी संयमी प्रचार केला होता. एकमेकांवर ओरखडे काढले नव्हते. प्रचारकांची माथी भडकली नव्हती मात्र, उष्णतामान भडकले होते. त्याचा परिणाम मतदानावर झाला आणि मतदारांनी मतदानासाठी घराबाहेर पडणे टाळले.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### ज्ञानवापी सर्वेक्षणाचे आदेश देणाऱ्या न्यायमूर्तींना धमकी

नवी दिल्लीः वाराणसीमधील बहुचर्चित ज्ञानवापी मशीद संकुलाच्या व्हिडिओग्राफिक सर्वेक्षणाचे आदेश दिल्यानंतर प्रसिद्धीच्या झोतात आलेले अतिरिक्त सत्र न्यायाधीश रवी कुमार दिवाकर यांनी जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्या आहेत. आंतरराष्ट्रीय क्रमांकांवरून आलेल्या फोनवर या धमक्या मिळाल्याची तक्रार त्यांनी पोलिसांकडे केली आहे. बरेली पोलीस अधीक्षकांना लिहिलेल्या पत्रात न्यायमूर्ती दिवाकर यांनी म्हटले आहे की, ''१५ एप्रिल रोजी एका आंतरराष्ट्रीय क्रमांकावरून कॉल आला. यावेळी बोलणाऱ्याने जीवे मारण्याची धमकी दिली.


बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१६ | शुक्रवार दि.२६ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


# सरकारकडून कारखानदारांना मदत; शेतकरी मात्र वाऱ्यावर

## निवडणुकांच्या रणधुमाळीतही २१ साखर कारखान्यांना दिली कर्जाची गॅरंटी



**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यात लोकसभा निवडणुकांचे पडघम वाजले आहेत. पहिल्या टप्प्यातील मतदान पार पडले आहे. तर आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. मात्र आचारसंहिता लागू होण्यापुर्वीच राज्यातील आजारी साखर कारखान्यांना कर्ज देण्याची हमी राज्य सरकारने दिल्याचे उघड झाले आहे. सरकारने २१ साखर कारखान्यांच्या कर्जाची हमी घेतल्याने या कारखान्यांना दिलासा मिळाला आहे. दुसरीकडे शेतकरी यंदा पहिल्यापासूनच अडचणीत आहे शिवाय आता नुकत्याच झालेल्या अवकाळीने प्रचंड नुकसान झाले असून अद्याप पर्यंत शेतकऱ्यांना मदत मिळालेली नाही. शासनाच्या या वर्तणुकिने शेतकऱ्यांतून संताप व्यक्त होत आहे.**

हाती आलेल्या वृत्तानुसार, २१ साखर कारखान्यांच्या कर्जाची हमी राज्य सरकारने घेतली आहे. या २१ पैकी १५ कारखाने सत्तेत सहभागी झालेल्या शिंदे गटातील नेत्यांचे आहेत. तर सहा कारखान्यांमध्ये दोन शरद पवार गट, एक काँग्रेस, दोन अपक्ष आणि एक तटस्थ असणाऱ्या नेत्याचे आहेत.

राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाच्या माध्यमातून सहकारी कारखान्यांना कर्ज दिले जाते. मात्र हे कर्ज राज्य सरकारने हमी दिल्यानंतरच देण्यात येते. यामुळे अनेक साखर कारखाने हे सद्या आजारी आहेत. यांच्याकडे पुरेसे भांडवल नसल्याने कर्जासाठी राज्य सरकारकडे अनेक प्रस्ताव देण्यात आले आहेत. मात्र, यातील जे सत्तेत सहभागी झाले आहेत. त्यांच्या ◀◀ पान २ वर

### जरांगेंचा खास माणूस निवडणुकीच्या रिंगणात

#### ● बीड लोकसभेत नवा ट्विस्ट




**बीड । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील हे मूळ बीड जिल्ह्यातील असून निवडणूक काळातही ते बीड जिल्ह्यात दौरे करत आहेत. लोकसभा निवडणुकीत आपण उमेदवार देणार नाहीत, असे जरांगे यांनी जाहीर केले. मात्र, त्यांच्या खंद्या शिलेदाराने गंगाधर काळकुटे यांनी आता बीडमधून रणशिंग ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

**वर्षा गायकवाड यांना लोकसभेची उमेदवारी**

मुंबई– काँग्रेसकडून आज मोठी घोषणा करण्यात आली आहे. काँग्रेसने उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघातून वर्षा गायकवाड यांना उमेदवारी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे भाजपकडून या मतदारसंघात उमेदवाराची घोषणा अद्याप करण्यात आलेली नाही.

**एकनाथ खडसेंचा भाजप प्रवेश रखडला**

मुंबईः राज्यातील तीन प्रमुख नेत्यांमुळे एकनाथ खडसेंच्या प्रवेशाला ब्रेक लागल्याची माहिती मिळत आहे. राज्यात कार्यक्रम घेऊन एकनाथ खडसेंना सोबत घ्या, असे केंद्राकडून सांगण्यात आले. मात्र राज्यातील तीन वरिष्ठ नेते याबाबत उदासीन असल्याची माहिती आहे. याचे कारण म्हणजे खडसेंना आताच भाजपमध्ये घेतले तर निवडणुका सुरू असताना गटातटाचे राजकारण सुरू होईल, त्यामुळे निवडणुकीनंतर प्रवेश सोहळा करू अशी राज्य भाजपची भूमिका असल्याचे कळते आहे. तसेच केंद्राकडून पुन्हा विचारणा झाली तर खडसेंचा प्रवेश निवडणुकीनंतर होणार असल्याचे सांगितले जाऊ शकते.

# बहुजन, ओबीसीमधील चार दिग्गज अलिप्त !

## जनतेचा सुर; जयदत्त क्षीरसागर, सुभाष राऊत, बाबुराव पोटभरे, भारत सोन्नर यांना व्यासपीठावर घ्या



### जनमाणसात कोणाची ताकद किती?

**विशेष प्रतिनिधी । बीड**

**भाजपच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्यासाठी ही निवडणुक प्रतिष्ठेची असून ओबीसींसह बहुजन समाजाची मोट बांधण्याची गरज असून एकाला धरण्याच्या प्रयत्नात ओबीसी व बहुजन समाजातील काही नेते हातचे सुटतात की काय? अशी स्थिती निर्माण झाली आहे. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, समता परिषदेचे नेते सुभाष राऊत, बहुजन समाजाचे नेते बाबुराव पोटभरे आणि धनजर समाजाचे नेते भारत सोन्नर हे अद्याप कोणाच्याच व्यासपीठावर दिसले नाहीत. या चार नेत्यांना आपल्या बाजूला वळवण्यात पंकजाताई मुंडे यांना यश आले तर त्यांची बाजू मजबूत होण्यास मदत होऊ शकते, असे म्हटले जात आहे.**

बीड लोकसभा निवडणुक ही तिरंगी होणार असून भाजपच्या उमेदवार पंकजाताई मुंडे, महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे आणि वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे हे मैदानात आहेत. यावेळच्या निवडणुकीला वेगळाच रंग आला असून मराठा समाज हा बजरंग सोनवणे यांच्या बाजूने झुकला आहे. तर ओबीसी समाजाची सहानुभुती पंकजाताई मुंडे यांच्या बाजुने आहे. मात्र ओबीसीमधील तीन आणि बहुजन समाजातील एक बडा नेता अजूनही कोणाच्याच व्यासपीठावर नाही. हे चार नेते जर पंकजाताई मुंडे यांच्या बाजूने गेले तर त्याचा मोठा ◀◀ पान २ वर

**जयदत्त क्षीरसागर**

जयदत्त क्षीरसागर हे दिग्गज नेतृत्व आहे, बीड जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यात त्यांचे समर्थक आहेत. बीड विधानसभा मतदार संघात मोठी ताकद, संस्थांचे जाळे असल्याने मोठा कर्मचारी वर्ग, बीड शहरातील मुस्लिम मतदारांवर प्रभाव, मागासवर्गीय मतदारांमध्येही चलती, ओबीसी आणि मराठा समाजामध्येही मोठ्या प्रमाणात समर्थक असून ही त्यांची बलस्थाने आहेत.

**ॲड. सुभाष राऊत**

माळी समाजाचे प्रतिनिधित्व करतात, मंत्री छगन भुजबळ यांचे विश्वासू, ओबीसी मोर्चाचे बीड जिल्ह्यात नेतृत्व केले. सभा यशस्वी केल्याने ओबीसीमधील छोट्या मोठ्या घटकामधील मतदारांवर प्रभाव, धनगर समाजाचे नेते अमर ढोणे, बारा बलुतेदार संघटनेचे प्रकाश कानगावकर, परिट समाजाचे गणेश जगताप यांना सोबत घेऊन काम केल्याचा फायदा या बाबतीत सुभाष राऊत चांगला प्रभाव टाकू शकतात.

**बाबुराव पोटभरे**

माजलगावचे भुमिपुत्र असून जिल्ह्यातील बहुजन समाजावर चांगली पकड ठेवून आहेत. आक्रमक बाणा आणि अभ्यासू नेतृत्व असल्याने बहुजन समाज अजूनही त्यांच्यावर विश्वास ठेऊन आहे.

**भारत सोन्नर**

धनगर समाजाचे नेते असून जिल्हाभर प्रभाव चांगला आहे. समाजाच्या मागण्यासाठी भारत सोन्नर यांनी अनेक आंदोलने केली आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील धनगर समाज त्यांच्या पाठीशी आहे.

# पंकजा मुंडेंनी बीड सांभाळावे, केलेली वक्तव्ये अंगलट येतात

## छगन भूजबळ यांचे पंकजांना खडेबोल

**नाशिक । प्रतिनिधी**

**नाशिकच्या जागेसंदर्भात महायुतीकडून निर्णय होत नसल्याने उलटसुलट चर्चा सुरु आहेत. त्यातच पंकजा मुंडेंनी नाशिकमधून प्रितम मुंडेंना तिकीट देईन, असे विधान केले होते. पंकजा मुंडेंना आता छगन भुजबळांनी सल्ला दिला असून त्यांनी अगोदर बीड सांभाळावे कारण केलेली वक्तव्ये अंगलट येतात असे ते म्हणाले आहेत.**

बीडच्या सभेत बोलताना गुरुवारी पंकजा मुंडे म्हणाल्या होत्या की, मी प्रितम मुंडेंना विस्थापित करणार नाही हा माझा शब्द होता. मुळात हे तिकीट मला नकोच होते. मी ते मला नका देऊ म्हणत होते. परंतु आता मी निवडणुकीच्या मैदानात आहे. प्रितम यांना मी विस्थापित करणार नाही. प्रितम यांचे काहीच अडलेले नाही, मी प्रितम यांना नाशिकमधून उभे करेन, असे पंकजा मुंडे म्हणाल्या होत्या. पंकजा



मुंडेंच्या या विधानावर भुजबळांनी त्यांना प्रत्युत्तर दिले आहे. छगन भुजबळ म्हणाले की, पंकजा मुंडेंनी अगोदर बीड सांभाळावे. बीडमध्ये १३ तारखेला निवडणुका आहेत. त्यांनी तिकडे लक्ष देवून निवडून येणे महत्त्वाचे आहे. नाशिकमध्ये उमेदवार नाहीत, असे नाही. उमेदवार खूप आहेत हीच अडचण आहे. पंकजा मुंडेंनी सगळ्यांना बरोबर घेऊन निवडून यावे. माझ्या तिकीटाचा निर्णय हा मराठा ◀◀ पान २ वर

### कारच्या धडकेत युवकाचा जागीच मृत्यु

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई-लातूर महामार्गावर असलेल्या सायगावजवळ चारचाकी वाहनाने दुचाकीस दिलेल्या जोराच्या धडकेत युवक जागीच ठार झाल्याची घटना बुधवारी (दि.२४) रात्री १ वाजण्याच्या सुमारास घडली.

शेख खलील दादामिया (वय-३८) असे ठार झालेल्या युवकाचे नाव आहे.तालुक्यातील सायगावजवळ चारचाकी वाहनाने दुचाकीवरुन येत असलेला तरुण शेख खलील दादामिया यास जोराची धडक दिली. या तो गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाला.अंबाजोगाई शहरातील वीट उद्योजक शेख दादामिया पाशा यांचा शेख खलील हा मुलगा ◀◀ पान २ वर


# शिरूर तालुक्यात पाणीटंचाईचा पहिला बळी

## इन कॅमेरा शवविच्छेदनासाठी नातेवाईकांचा घाट

**शिरूर । प्रतिनिधी**

**हंडाभर पाणी आणण्यासाठी विहिरीत उतरलेल्या महिलेचा पाय घसरल्याने विहिरीत पडल्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची झाल्याची घटना गुरुवार दि. २५ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास तालुक्यातील हिंगेवाडी येथे घडली आहे. असे असताना मृत महिलेच्या नातेवाईकांनी शव विच्छेदन इन कॅमेरा करण्याचा घाट बांधल्याने रात्री उशिरापर्यंत मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले नव्हते.**





शिरूर कासार तालुक्यामध्ये दुष्काळाच्या प्रचंड झळा निर्माण झाल्या असल्याने तालुक्यातील जनतेला तीव्र पाणीटंचाईला सामोरे ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२५ एप्रिल २०२३**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ६.५० क्विंटल | २,२४५ | २,९५१ | २,४४९ |
| ज्वारी/हायब्रिड : ११४.०० क्विंटल | २,३६१ | ३,२५१ | २,६४६ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : ५९.५० क्विंटल | ८,७११ | १०,८०० | १०,२३१ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: ४.०० क्विंटल | २,६५० | २,७०० | २,६८० |
| चिंचोका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४०० | २,४०० | २,४०० |
| सोयाबीन: १२८.५० क्विंटल | ४,५५० | ४,६११ | ४,५७५ |
| हरभरा: ९.०० क्विंटल | ४,६५० | ६,९३६ | ५,८८१ |

# विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेत लिहिले जय श्री राम; शिक्षकाने सगळ्यांना करुन टाकले पास

## शिक्षकांवर कारवाईची टांगती तलवार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**उत्तर प्रदेशच्या जौनपूरमधील पूर्वांचल विद्यालयात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. येथील चार विद्यार्थ्यांनी आपल्या उत्तरपत्रिकेमध्ये उत्तरांऐवजी 'जय श्री राम' आणि काही क्रिकेटपटूंची नावे लिहिली होती. या चार विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करण्यात आले आहे. या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५६ टक्के मार्क देण्यात आल्याचे समोर आले आहे.**

वीर बहादूर सिंह पूर्वांचल विद्यालयातील एका माजी विद्यार्थ्याने माहिती अधिकारांतर्गत माहिती मागवली होती. विद्यालयातील डी-फार्माच्या पहिल्या आणि दुसऱ्या सेमिस्टरच्या विद्यार्थ्यांनी परीक्षेमध्ये प्रश्नांची उत्तर लिहिण्याऐवजी जय श्री राम आणि काही क्रिकेटपटूंची नावे लिहिली होती. अशा विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करण्यात आले आहे. याप्रकरणी दोन शिक्षक डॉ. विनय वर्मा आणि डॉ. आशुतोष गुप्ता यांच्यावर कारवाईची टांगती तलवार आहे. माजी विद्यार्थ्याला उपलब्ध करुन देण्यात आलेल्या उत्तरपत्रिकांमधून धक्कादायक माहिती समोर आली. चार विद्यार्थ्यांनी आपल्या उत्तरपत्रिकांवर 'जय श्रीराम, पास हो जाएं'




आणि विराट कोहली, रोहित शर्मा, हार्दिक पांड्या अशी काही क्रिकेटपटूंची नावे लिहिण्यात आली होती. असे असताना विद्यालयातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ७५ पैकी ४२ मार्क दिले, म्हणजे त्यांना ५६ टक्के मार्ग देऊन उत्तीर्ण करण्यात आले. माजी विद्यार्थी दिव्यांशु याने याप्रकरणी तक्रार दाखल केली होती. तक्रारीमध्ये म्हणण्यात आले होते की, शिक्षकांनी पैसे घेऊन विद्यार्थ्यांना उत्तीर्ण केले आहे. याप्रकरणी २१ डिसेंबर २०२३ रोजी तपास करुन ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# घाबरवणाऱ्या, भ्रामक कल्पना येतात तरी कशा !

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचे मतदान पार पडले, आता दुसऱ्या टप्प्याची तयारी सुरू आहे. पहिल्या टप्प्यात कमी मतदान झाले, मतदानाची टक्केवारी घसरली परंतु निवडणूक प्रचार घसरला नव्हता. सर्वच पक्षांनी संयमी प्रचार केला होता. एकमेकांवर ओरखडे काढले नव्हते. प्रचारकांची माथी भडकली नव्हती मात्र, उष्णतामान भडकले होते. त्याचा परिणाम मतदानावर झाला आणि मतदारांनी मतदानासाठी घराबाहेर पडणे टाळले. त्यामुळे मतदानाची टक्केवारी घसरली असे म्हटले जात आहे.

आता दुसऱ्या टप्प्याला प्रारंभ झाला आहे. अजूनही उष्णतामानात फरक नाही परंतु अधूनमधून अवकाळी अस्तित्व दाखवत असल्याने थंडावा मिळतो आहे. परंतु काय झाले कोणास ठाऊक, आता प्रचारकांची माथी भडकताना दिसत आहेत. आता धार्मिक विद्वेषातून आधारित प्रचाराला सुरुवात झाली आहे. याची सुरुवात भाजप नेत्यांनी केली असून, त्यात पंतप्रधान मोदी आघाडीवर आहेत. जनतेच्या कमाईवर 'पंजा' मारण्याचा काँग्रेसचा इरादा असून काँग्रेसच्या काळात मंगळसूत्रसुद्धा सुरक्षित नाही असा पंतप्रधान मोदींनी आरोप केला आहे. काँग्रेसने देशातील सर्वसामान्यांची संपत्ती काढून घेऊन ती अल्पसंख्याकांना देण्याचा निर्धार केला आहे असे सांगताना मोदी म्हणाले, तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी देशातील संपत्तीवर पहिला अधिकार मुस्लिमांचाच असल्याचे म्हटले होते. आता काँग्रेसवाले सत्तेवर आल्यावर तुमच्या संपत्तीची माहिती घेतील. तुमच्या मालकीची दोन घरे असतील तर एक घर जप्त केले जाईल, तुमच्या महिलांच्या अंगावर असलेले मंगळसूत्रही काढून घेतले जाईल आणि ही सारी संपत्ती ज्यांना जादा मुले आहेत अशा घुसखोरांना दिली जाईल, असे भयानक विधान मोदींनी प्रचारसभेत केले. काँग्रेससह विरोधकांनी मोदींच्या वक्तव्यावर आक्षेप घेतला आहे. काँग्रेसने यासंबंधात निवडणूक आयोगाकडे रीतसर तक्रारही केली आहे. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात मोदी म्हणतात तसे काहीही नाही हे मोदींना प्रत्यक्ष भेटून सांगणार असल्याचे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी म्हटले.

मोदींकडून करण्यात आलेली वक्तव्ये अवास्तव आहेत, लोकांना नाहक घाबरवणारी व त्यांच्यात भ्रम निर्माण करणारी आहेत, असे काँग्रेस नेत्यांचे म्हणणे आहे. पहिल्या टप्प्यापर्यंत मोदी हे काँग्रेसचा भ्रष्टाचार आणि त्यांचा परिवारवाद याच मुद्यांच्या मर्यादेत राहिले होते. पण पहिल्या टप्प्यात भाजप युतीला मतदान टक्केवारीचा फटका बसल्यानंतर ते आता पुन्हा हिंदू-मुस्लिम या धार्मिक ध्रुवीकरणाकडे वळले आहेत असा आरोप केला जात आहे तो बहुतांशी खरा मानायला जागा आहे. अन्यथा मोदींना प्रचारसभांमध्ये असा अचानक आक्रस्ताळेपणा करण्याची गरज भासली नसती. पंतप्रधानांनी घुसखोर, जास्त मुले असलेले लोक असे शब्द वापरले आहेत, ते कोणाला उद्देशून वापरले आहेत ते वेगळे सांगण्याची गरज नाही. जास्त मुलांच्या संदर्भात म्हणाल तर खुद्द मोदींच्या घरी सहा भावंडे आहेत, अमित शहांचीही तितकीच भावंडे आहेत. मोदींची प्रचारशैली धडाकेबाज असते. आपल्या वक्तृत्वशैलीच्या जोरावर ते विरोधकांना गुंगवून टाकतात. मोदींच्या विरोधात महागाई, बेरोजगारी, इलेक्टोरल बाँडमधील गैरव्यवहार, त्यांनी श्रीमंत उद्योगपतींवर केलेली खैरात असे मुद्दे विरोधकांनी काढले तेव्हा या मुद्यांचा रोख बदलण्यासाठी मोदींनी आपल्या वक्तव्यांनी विरोधकांना सैरभैर करून टाकले. राजकारणाच्या खेळ्या म्हणून हा प्रकार रास्त असेलही पण ते कितपत योग्य आहे याचाही विचार झाला पाहिजे. काँग्रेस महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून घेऊन ते घुसखोरांना देण्याच्या विचारात आहे अशा प्रकारचे विधान पूर्णत: अवास्तव अन् अश्लाघ्य स्वरूपाचे आहे. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात तसा उल्लेख आहे असे म्हणणे, म्हणजे तर फाजीलपणाचाच प्रकार म्हटला पाहिजे. मोदींनी काँग्रेसवर जे आरोप केले आहेत त्याला कसलाही आधार नाही. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या काही विधानांचा टोकाचा अन्वयार्थ लावून मोदी आक्रमक झाले आहेत. देशातील जनतेचे आर्थिक, सामाजिक आणि जातनिहाय सर्वेक्षण करून ज्यांची जितकी लोकसंख्या त्यांची तितकी भागीदारी हे सूत्र काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात स्वीकारले असून गत अनेक महिन्यांपासून राहुल गांधी हा मुद्दा मांडत आहेत. मोदींच्या सत्ताकाळात समाजात आर्थिक विषमता प्रचंड प्रमाणात वाढली आहे हे अनेक अहवालांतून दिसून आले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा 'शपथनामा' जाहीर



**मुंबई । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. या जाहीरनाम्याला 'शपथनामा' असे नाव देण्यात आले असून, यात अनेक घटकांतील लोकांना केंद्रस्थानी हा शपथनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर प्रचार गीत देखील रिलीज करण्याात आले आहे.**

या कार्यक्रमाला पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी खासदार वंदनाताई चव्हाण, युवक प्रदेशाध्यक्ष मेहमबूब शेख, महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे,पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप या कार्यक्रमाला उपस्थित होते. जाहीरनामा प्रसिद्ध करण्यापूर्वी राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार म्हणाले की, आम्ही मर्यादित जागा लढवत आहोत विविध प्रश्नांसंबधी आम्ही मांडणी केली आहे, त्याबाबत आमचे लोकं संसदेत आवाज उठवतील अशी ग्वाहीही यावेळी दिली. वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणारी लोकं जाहीरनामा तयार करणाऱ्या समितीत आहेत. महिला आणि मुली, शेतकरी, कामगार, दिव्यांग, तृतीयपंथी, नागरी विकास, आरोग्य, पर्यावरण हे घटक डोळ्यासमोर ठेवून जाहीरनामा तयार करण्यात आला आहे. पर्यटन, राष्ट्रीय सुरक्षा हे मुद्दे घेण्यात आले आहेत असे वंदनाताई चव्हाण म्हणाल्या. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शपथनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. यामध्ये महिला, तरुण, तसेच कामगार यांच्यासह जतनिहाय जनगणना, शेतकऱ्यांना शेतमालाला हमीभाव, राष्ट्रीय सुरक्षा, उपक्षीत नागरिक, ज्येष्ठ नागरिक, आरोग्य, शिक्षण, क्रीडा, उद्योग, कर प्रणाली, नागरी विकास, पर्यावरण, पर्यटन, कला, सांस्कृतिक यांसह शाळांचा सेफ्टी ऑडिट यांच्यासह अनेक मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे. यावेळी पत्रकार परिषदेमध्ये बोलताना शरद पवार साहेब म्हणाले की, मागील दहा वर्षात शेती संबधीचे प्रश्न वाढले आहेत. हा कालखंड अमित शाह यांच्या पक्षाकडे होता. या कालावधीत त्यांनी काय केलं ते सांगावे. अमित शाह यांचे शेती संबधीच ज्ञान मर्यादीत, त्यावर जास्त काय बोलायचे? त्यांनी दहा वर्षात काय केले ते सांगावं. वीस वर्ष आधी काय झाले, चाळीस वर्ष आधी काय झाले हे विचारु नये असेही सांगितले. जयंत पाटील म्हणाले की, विदर्भात गेल्या दहा वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. त्यावर अमित शाहंकडे काय उत्तर आहे? शरद पवार साहेब कृषीमंत्री असताना आत्महत्या पाहून मनमोहन सिंगांना विदर्भात आणून कर्जमाफी करायला सांगितली होती. अजित पवार गटाने मागणी केली त्याचा आनंद आहे असेही जयंत पाटील म्हणाले.

## वर्षभरात २५५ बालविवाह थांबविण्यात चाईल्ड हेल्पलाईनला मिळाले यश!

### जिल्हाधिकारी यांनी केले अभिनंदन

**बीड । प्रतिनिधी**

**वर्षभरात २५५ बालविवाह थांबविण्यात चाईल्ड लाईन हेल्पलाइनला यश मिळाले आहे. याबाबत जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी अभिनंदन केले असून त्या म्हणाल्या, हा मैलाचा दगड सर केला आहे, जिल्ह्यात शून्य बालविवाहपर्यंत आणण्याचे आमचे ध्येय असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.**




बीड जिल्ह्यात बालविवाह निर्मुलन मोहीम जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्या मार्गदर्शनात राबवली जात आहे त्यामुळे हे यश मिळविता आले. जिल्हयात बाल विवाह होवू नये म्हणून नाविन्यपूर्ण मात्र, आवश्यक त्या उपाय योजना केल्या जात आहेत. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाअंतर्गत चाईल्ड हेल्पलाईन १०९८ मुळे एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ दरम्यान तब्बल २५५ बालविवाह थांबवण्यात, यश आले आहे. मागील वर्ष भरात जिल्ह्यातील आष्टी, परळी, गेवराई या तालुक्यातून बालविवाहाचे प्रकरणे बाहेर आली होती. या प्रकरणांना अंकुश घालण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास कार्यालय व इतर स्वयंसेवी संस्थाच्यामार्फत गाव पातळीवर विविध जनजागृती कार्यक्रम, बालविवाह प्रथा विरोधी प्रतिज्ञा, पथनाट्य, दवंडी अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे बालविवाह विषयक मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. यामुळे गावतील अल्पवयीन मुलींची लग्न होण्याआधी थांबविण्यास मदत झाली आहे. बालविवाह होत असल्यास किंवा संकटग्रस्त बालकांसबंधी कोणतेही प्रकरण लक्षात आल्यास त्याबाबत चाईल्ड हेल्पलाईन, १०९८ या टोल फ्री, क्रमाकावर माहिती देण्यात यावी. माहिती देण्या-यांचे नांव गोपनीय ठेवण्यात येते. अधिक माहितीसाठी अश्विनी जगताप, जिल्हा समन्वयक चाईल्ड हेल्पलाईन बीड, वरद प्राईड कॉम्प्लेक्स पहिला मजला धानोरा रोड बीड (-२०२३.) या ठिकाणी संपर्क करण्यात यावा.

" गावात घेण्यात आलेल्या पालक सत्र, चाईल्ड हेल्पलाईन जनजागृती व इतर स्वयंसेवी संस्थाच्या कामांमुळे बालविवाह सारख्या कुप्रथेचे दुष्परिणाम लोकांना समजले. या सर्व एकत्रित प्रयत्नांमुळे प्रशासनाला बालविवाह थांबवण्यासाठी यश आले आहे "

**- मंगेश जाधव**
**(परीविक्षा अधिकारी)**

सध्या लग्नसराईचे दिवस असल्याने धार्मीक स्थळांचे व्यवस्थापक, मंगल कार्यालय मालक / व्यवस्थापक यांनी वर (मुलगा) व वधू (मुलगी ) यांच्या वयाची खात्री शाळा सोडल्याचा दाखला किंवा निर्गम उता-यावरुन करावी.

**-सुधीर ढाकणे,**
**(जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी बीड)**

## धनंजय मुंडे यांनी फिल्डिंग लावून बजरंग सोनवणेंना उभे केले

### वंचितचा आरोप; अशोक हिंगे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**बीड । प्रतिनिधी**

**धनंजय मुंडे यांनी फिल्डिंग लावून बजरंग सोनवणे यांना पंकजा मुंडे यांच्याविरोधात डमी उमेदवार म्हणून उभं केल्याचा आरोप वंचितच्या प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकुर यांनी केला. जरी बजरंग सोनवणे निवडून आले तरी ते दिल्लीत जाऊन भाजपच्या बाजूने बसतील असंही त्या म्हणाल्या. बीडमध्ये वंचित बहुजन आघाडीचे लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे यांनी आज जोरदार शक्ती प्रदर्शन करत जाहीर सभा घेतली. या सभेला संबोधित करताना वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखा ठाकूर यांनी हे वक्तव्य केले आहे.**

बीड लोकसभेच्या निवडणुकीमध्ये तिरंगी लढत होत असून यामध्ये वंचित बहुजन आघाडी, महायुती आणि महाविकास आघाडीचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. मात्र धनंजय मुंडे यांनी पंकजा मुंडे यांना निवडून आणण्यासाठी फिल्डिंग लावली असून बजरंग सोनवणे यांना डमी उमेदवार म्हणून उभं केलं असल्याचा आरोप वंचितच्या प्रदेशाध्यक्षा रेखा ठाकूर यांनी केला. पंकजा मुंडे यांच्या विरोधात बजरंग सोनवणे जरी निवडून आले तरी दिल्लीत ते भाजपच्याच बाजूला जाऊन बसतील असेदेखील रेखा ठाकूर म्हणाल्या. त्यावेळी सभेत बोलताना रेखा ठाकूर यांनी पंकजा मुंडे आणि बजरंग सोनवणे यांच्यावर टीका केली. बजरंग सोनवणे हे धनंजय मुंडे यांनी उभे केलेले डमी उमेदवार असल्याचा आरोपही त्यांनी केला. याच सभेमध्ये बोलताना वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्यावर जोरदार टीका केली. निवडणूक आली की बजरंग सोनवणे यांना मराठा समाज आठवतो, ते जरी जातीने मराठा असले तरी कर्माने मराठा नाहीत असं म्हणत अशोक हिंगे यांनी बजरंग सोनवणे यांचा मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून चांगला समाचार घेतला. यापूर्वी जे मराठा आंदोलन झाले त्यामध्ये बजरंग सोनवणे कुठेच नव्हते. मनोज जरांगे यांची बीडमध्ये आणि आंतरवाली सराटी येथे जी सभा झाली तिथे देखील ते कुठे दिसले नाही. जेव्हा अंतरवाली सराटीमध्ये लाठीचार्ज झाला तेव्हा पहिल्यांदा प्रकाश आंबेडकर यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला होता.त्या घटनेची चौकशी करावी अशी मागणी केली होती. त्यामुळे बजरंग सोनवणे हे फक्त निवडणुकीपुरताच मराठा समाजाचा वापर करतात अशी टीका अशोक हिंगे यांनी केली. ऊसतोड मजुरांच्या प्रश्नावरून भावनिक करून पंकजा मुंडे मत मागत आहेत असा आरोप अशोक हिंगे यांनी केला. ते म्हणाले की, या निवडणुकीमध्ये पंकजा मुंडे या ऊसतोड मजुरांच्या प्रश्नावरून भावनिक करून मत मागत आहेत. मात्र त्यांनी आतापर्यंत ऊसतोड मजुरांसाठी काय केलं हे सांगावं. प्रीतम मुंडे यांच्या काळात रेल्वेचे काम एवढ्या संथ गतीने सुरू आहे, त्यामुळे बीडला रेल्वे येण्यासाठी आणखी पंधरा वर्षे लागतील असा आरोप अशोक हिंगे यांनी केला.

## गेवराईचे ॲड.संजय काळे लोकसभेच्या मैदानात



**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीचा फार्म भरण्याची शेवटची तारीख होती. डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि छत्रपती शिवरायांना अभिवादन करून पुढे नगर रोडवरील रॅलीत बीड जिल्ह्याचे नेते लक्षात दादा पवळ, अँड. शिवाजीराव सोळंके साहेब, विनोद आप्पा इंगोले, छावा संघटनेचे प्रदेश संघटक तथा छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचे उपाध्यक्ष शिवश्री शामराव गायकवाड (पाटील), प्रहार संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष मा. विजय दादा काळूंखे, जिल्हा उपाध्यक्ष शेख रहीम भाई, प्रहार गेवराई तालुकाध्यक्ष अर्जुन सुतार यांच्यासह अनेक मान्यवर आणि विविध पक्षांचे, संघटनांचे पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते, मागील बऱ्याच दिवसांपासून गेवराई शहरात व बीड जिल्ह्यात संजय भाऊ काळे उभं राहण्याची चर्चा होती, आज त्यांनी रॅली ने आपला फार्म भरला.

## पान १वरून...

### जरांगेंचा खास माणूस

फुंकले आहे. त्यामुळे, जरांगे पाटील काय भूमिका घेतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनातील सहकारी असलेले गंगाधर काळकुटे यांनी बीड लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे, बीड लोकसभा निवडणुकीच्या रणांगणात चुसर वाढली आहे. दरम्यान, जरांगे पाटील यांच्याशी भेटून अर्ज मागे घ्यायचा का नाही हे ठरवणार असल्याचे काळकुटे यांनी म्हटले आहे. जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनात सहभागी असलेले सहकारी आणि बीडचे रहिवाशी गंगाधर काळकुटे यांनी बीड लोकसभेच्या निवडणुकीसाठी गुरूवारी उशिरा अर्ज भरला. बीडमध्ये प्रचाराच्या मुद्यात सध्या मराठा आरक्षणाचा मुद्दा गाजत आहेत. त्यामुळे, पंकजा मुंडे आणि बजरंग सोनवणे हे दोन्ही उमेदवार मराठा आरक्षणा संदर्भातील भूमिका मांडताना दिसून येतात. त्यामुळेच, आपण मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून व समाजाच्या हितासाठी निवडणूक लढत असल्याचे गंगाधर काळकुटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी बोलताना म्हटले. तसेच, या संदर्भात मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन, चर्चा केल्यानंतरच अर्ज ठेवायचा की मागे घ्यायचा याचा निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**जरांगेंच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष**

गंगाधर काळकुटे हे मनोज डांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनातील अगदी जवळचे सहकारी आहेत. एकीकडे जरांगे पाटील यांनी लोकसभा निवडणुकीमध्ये आपण उमेदवार उभा करणार नसल्याची भूमिका घेतली. मात्र, गंगाधर काळकुटे यांनी बीडमधून उमेदवारी अर्ज भरल्याने मनोज जरांगे पाटील नेमका काय निर्णय घेतील, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. जरांगे पाटील यांच्या भूमिकेकडे बीडमधील मराठा समाज आणि महाविकास आघाडी व महायुतीच्या उमेदवारांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, बीड लोकसभा निवडणुकीमध्ये आज फॉर्म भरायच्या शेवटच्या दिवसापर्यंत एकूण ९९ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. त्यामध्ये अनेक उमेदवारांनी कुणी दोन-तीन असे फॉर्म भरलेले आहेत.

------------

### सरकारकडून कारखानदारांना मदत शेतकरी

प्रस्तावांवर राज्य सरकारने हमी दिली आहे. अशा २१ साखर कारखान्यांना लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने हमी दिली आहे. एनसीडीसी कडून कर्जासाठी राज्याने शिफारस केलेल्या कारखान्यांमध्ये कोल्हापुरमधील अपक्ष आमदार विनय कोरे यांचा तात्यासाहेब कोरे सहकारी साखर कारखाना, राष्ट्रवादी-अजित पवार गटातील प्रकाश सोळंके यांचा बीडमधील लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना आणि शिवसेना-एकनाथ शिंदे गटातील मंत्री संदिपान भुमरे यांचा छत्रपती संभाजीनगर येथील श्री रेणुका शरद सहकारी साखर कारखान्याचा समावेश आहे. वरील नेते हे सध्या सत्तेत सहभागी आहेत. तसेच या यादीत राष्ट्रवादीचे आमदार मकरंद जाधव यांच्या साताऱ्यातील किसनवीर सहकारी साखर कारखान्याच्या दोन युनिट्सचाही उल्लेख आहे. मकरंद जाधव हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटात सहभागी झाले आहेत. यादरम्यान पाटील यांनी एका निवेदनात म्हटले होते की, जुलै २०२३ मध्ये अजित पवार यांची भेट घेऊन कर्जबाजारी साखर कारखान्यांना वित्तपुरवठा करण्याबाबत चर्चा करण्यासाठी गेल्याचे म्हटले होते. यावेळी राष्ट्रवादीचे जवळपास सर्व आमदार होते असेही त्यांनी म्हटले होते. श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखाना धाराशिवचे अध्यक्ष बसवराज पाटील यांनी, कर्ज हमीत राजकीय संबंध नाकारले आहे. तसेच राज्यातील सहकार संरचनेचे महत्त्व लक्षात घेऊन राज्याने हा निर्णय घेतल्याचे ते म्हणाले. पाटील यांनी काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश केला होता. सत्ताधाऱ्यांसोबत नसलेल्या सहा कारखान्यांमध्ये शरद पवार गट, काँग्रेस, अपक्ष आणि एक तटस्थ असणाऱ्या नेत्याचे आहेत. यात राष्ट्रवादी-शरद पवार गटाचे आमदार अशोक पवार यांचा रावसाहेबदादा पवार घोडगंगा एसएसके लिमिटेड, राजेंद्र नागवडे यांचा कोणत्याही पक्षासी संबंध नसून त्यांच्या सहकारमहर्षी शिवाजीराव नागवडे एसएसके कारखान्याला कर्जाची हमी देण्यात आली आहे. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये महाराष्ट्र सरकारने नांदेडमधील संकटात सापडलेल्या भाऊराव चव्हाण एसएसकेला १४७.७९ कोटी रुपयांची सरकारी हमी दिली होती. तो आता माजी मंत्री अशोक चव्हाण यांच्या व्यवस्थापना खाली आहे. चव्हाण हे भाजपमध्ये गेले आहेत. चव्हाण यांच्या व्यतिरिक्त, राज्य सरकारने कर्जासाठी ६०० कोटींहून अधिक हमी अजित पवार गटातील माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या बीडमधील जय भवानी कारखान्याला दिली आहे. राज्यातील बहुतांश सहकारी कारखाने हे आमदार, खासदार आणि मंत्र्यांकडून सांभाळले जातात. राज्यातील सर्व सहकारी साखर कारखान्यांना कर्जाची हमी मिळालेली नाही. गेल्या सप्टेंबर महिन्यात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून पाच कारखान्यांना कर्जाची हमी देण्यात आली होती. यावेळी राज्य सरकारने १७८.२८ रुपये कर्जाची हमी दिली होती. तर २०२२-२३ या वर्षात ३४ कारखान्यांना ८९७.६५ कोटींचा कर्ज पुरवठा राज्य सहकारी बँकेकडून केला गेला होता. त्यापैकी १७८.२८ कोटी रुपयांची कर्ज हमी ही सहा कारखान्यांना दिली होती.

------------

### बहुजन, ओबीसीमधील चार दिग्गज

फायदा होऊ शकतो. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे बीड विधानसभा मतदारसंघासह पाटोदा, शिरुर, वडवणी, केज, गेवराई, माजलगाव, धारुर या तालुक्यात मोठ्या प्रमाणात त्यांचे समर्थक आहेत. त्यामुळे ज्या बाजूने जयदत्त क्षीरसागर झुकतील त्या उमेदवाराच्या पदरात अंदाजे ५० हजार मते तरी टाकतील, अशी चर्चा आहे. त्यामुळे पंकजाताई मुंडे यांना समर्थन देतात की बजरंग सोनवणे यांच्या बाजूने उभे राहतात, याकडे संपुर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. त्यानंतर समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष व मंत्री छगन भुजबळ यांचे कट्टर समर्थक सुभाष राऊत यांनी अजूनही कोणतीच भुमिका घेतली नाही. माळी समाजाची मते बीड जिल्ह्यात एक ते दिड लाखांच्या पुढे आहे. त्यामुळे राऊत यांच्या भुमिकेलाही महत्व आहे. बाबुराव पोटभरे हे बहुजन समाजाचे नेते आहेत. त्यांचा प्रभाव संपुर्ण बीड जिल्ह्यात आहे. त्यामुळे ते काय भुमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भारत सोन्नर हे धनगर समाजाचे नेते असून ते अजूनही कोणाच्याही व्यासपीठावर दिसले नाहीत. त्यामुळे त्यांची भुमिका काय राहणार याची सर्वांना उत्सुकता आहे. दुसरीकडे मराठा समाजाची मते आपल्या पदरात पडावीत यासाठी पंकजाताई मुंडे यांच्याकडून जोरदार प्रयत्न केले जात आहेत. मात्र मराठा समाजाची मते त्यांना किती मिळतील हे सांगणे तसे कठीण होऊन बसले आहे. त्यामुळे जे मिळणारच नाही, त्याच्या मागे लागण्यापेक्षा दुसरे पर्यायी गणित काय होऊ शकते याचा विचार करण्याची वेळ आल्याचे आता सामान्य नागरीकातून म्हटले जात आहे. एकाला सोबत घेण्याच्या प्रयत्नात दुसरे मात्र हातची सुटतील, अशी चर्चा सध्या रंगू लागली आहे. त्यामुळे पंकजाताई मुंडे यांनी ओबीसी आणि बहुजन समाजाची मोट बांधण्याचा प्रयत्न करावा, अशी मागणी होत आहे. ओबीसी समाजातील तीन आणि बहुजन समाजातील एक अशा चार नेत्यांमुळे बीड लोकसभेतील चित्र बदलू शकते, असे म्हटले जात आहे. त्यामुळे या नेत्यांना आपल्या बाजूला घेण्यासाठी येणाऱ्या काळात पंकजाताई मुंडे आणि बजरंग सोनवणे यांच्याकडून जोरदार प्रयत्न केले जाण्याची शक्यता आहे. ज्या उमेदवाराला या चार नेत्यांना आपल्या व्यासपीठावर आणणे जमेल, त्याच्या बाजूने बीड लोकसभेचा निकाल लागेल, असेही म्हटले जात आहे.

------------

### शिरूर तालुक्यात

जावे लागत आहे. याचाच एक भाग म्हणजे आजची ही दुर्दैवी घटना. तालुक्यातील हिंगेवाडी या गावची महिला चंद्रकला दगडू फुल माळी ही महिला गुरुवार दि.२५ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास विहिरीवर पाणी आणण्यासाठी गेलीअसता सदरील महिलेचा विहिरीमध्ये पाय घसरून पडल्याने तिचा दुर्दैवी मृत्यू झाले असल्याचे समोर आले आहे. मात्र या घटनेचा पोलीस पंचनामा न करता नातेवाईकांनी महिलेच्या मृतदेहावरील उत्तर प्रक्रिया( शव विच्छेदन ) इन कॅमेरा करण्यात यावे यासाठी जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे. याविषयी शिरूर पोलीस स्टेशनला चौकशी केली असता सदरील मृत महिलेला इन कॅमेरा रुग्णालयाकडे पाठवण्यात आले आहे. एवढीच माहिती सांगण्यात आली घटनेचा पंचनामा अथवा घटनेची कसलीही दप्तरी अद्याप नोंद नसल्याचे सांगण्यात आले. एकीकडे पाणीटंचाईचा बळी म्हणावे तर मग इन कॅमेरा शव विच्छेदनासाठी नातेवाईकांनी घाट का घातला हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे सहाजिकच पाणीटंचाईचा बळी संशयात्मक मृत्यू याबद्दल तालुक्यात उलट सुलट चर्चा ऐकायला मिळत आहे.

**नातेवाईकांच्या आग्रहामुळे शव विच्छेदन जिल्हा रुग्णालयात**

विहिरीत पडून चंद्रकला दगडू फुलमाळी महिलेच्या मृत्यू झाला, नातेवाईकांनी इन कॅमेरा सौ विच्छेदन करण्यासाठी जिल्हा रुग्णालयाकडे आग्रह धरल्यामुळे सदरील मृतदेह जिल्हा रुग्णालयाकडे पाठवण्यात आला आहे. यामुळे वैद्यकीय अहवालानंतरच याविषयी माहिती सांगता येईल.

**गणेश धोकरट , पोलीस निरीक्षक शिरूर कासार**

------------

### कारच्या धडकेत

होता.या घटनेमुळे पेन्शनपुरा परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, या घटनेचा अधिक तपास अंबाजोगाई ग्रामीण पोलिस करीत आहेत.

-----------

### पंकजा मुंडेंनी बीड सांभाळावे

समाज नाराज होता म्हणून नाही आहे. उलट मराठा समाज माझ्याबरोबर होता. अनेकांनी मला समर्थन देऊन निवडणुकीत मदत करणार असल्याचे सांगितले होते. नाशिकचा निर्णय हा महायुती घेईन असे भुजबळ म्हणाले.

----------

### विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेत लिहिले जय

कारवाईचे आदेश देण्यात आले होते. विद्यालयाने एक कमिटी स्थापन केली होती. तपासामधून धक्कादायक माहिती समोर आली. तपासामध्ये दोन शिक्षक दोषी आढळून आले. समितीने उत्तरपत्रिका पुनर्मूल्यांकनासाठी बाहेरच्या शिक्षकांना दिल्या. त्यात विद्यार्थ्यांना शून्य मार्क मिळाले आहेत. कारण, त्यांनी एकाचेही उत्तर लिहिले नव्हते. त्यामुळे माजी विद्यार्थ्याने केलेला दावा खरा ठरला आहे. याप्रकरणी शिक्षकांवर कागदी कारवाई करण्यात आलेली आहे. पण, अद्याप कठोर कारवाई करण्यात आलेली नाही.

---------------

## बसस्थानकातून महिला अधिकाऱ्याचे सहा तोळे सोन्याचे दागिने लंपास

अंबाजोगाई : नातेवाईकाचे लग्न लावून लातूरला जाण्यासाठी निघालेल्या महिला बालविकास कार्यालयातील महिलेच्या पर्समधील पावणेदोन लाखांचे दागिने अंबाजोगाई बसस्थानकात चोरट्यांनी लंपास केले. ही घटना रविवारी (दि.२१) सायंकाळी घडली.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लातूर येथील महिला बालविकास कार्यालयात कार्यरत असलेल्या सीमा सुग्रीव इंगळे (रा. खोरे गल्ली, लातूर) या नातेवाईकच्या लग्नासाठी अंबाजोगाई तालुक्यातील पूस येथे आल्या होत्या. लग्न आटोपून लातूरला परत जाण्यासाठी त्या सायंकाळी पच वाजताच्या सुमारास अंबाजोगाई बसस्थानकात आल्या. तिथे तोंडाळ स्कार्फ बांधलेल्या एका महिलेने त्यांच्याजवळ येत तुमच्या गळ्यातील सोने बॅगेत ठेवा, बसस्थानकावर खूप गर्दी आहे असे सांगितले. त्यामुळे सीमा इंगळे यांनी त्यांच्याजवळील सोन्याचे गंठन, नथ, अंगठी, मणीमंगळसूत्र आणि चांदीची चैन असे एकूण पावणेदोन लाख रुपये किमतीचे सहा तोळे सोन्याचे दागिने स्वतःजवळील बॅगेतील डब्ब्यात ठेवले. त्यानंतर लातूरला जाणार्या बसमध्ये चढताना ती महिला त्यांच्या समोरच होती, दुसरी एक स्कार्फ बांधलेली महिला मागे थांबून त्यांना अडथळा निर्माण करत होती. बसमध्ये चढून सीटवर बसल्यानंतर सीम आयंनी बॅग तपासली असता दागिने चोरी गेल्याचे आढळून आले. बसस्थानकावरील सीसीटीव्ही तपासला असता पाठीमागे असणाऱ्या महिलेनेच चोरी करून पळ काढल्याचे दिसून आले. याप्रकरणी सीमा इंगळे यांच्या फिर्यादीवरून अनोळखी महिलेवर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार, दि. २६ एप्रिल २०२४ ३

# सातत्य माणसाला, समाजाला समृद्ध करते- प्रा. डॉ. वैशाली गोस्वामी

**माजलगाव । प्रतिनिधी**

माणसाने कुठल्याही कामात सातत्य ठेवणे आवश्यक आहे. सातत्य माणसाला, समाजाला समृद्ध करते असे प्रतिपादन संत साहित्याच्या अभ्यासक प्रा.डॉ. वैशाली गोस्वामी यांनी केले. येथील मराठवाडा साहित्य परिषद शाखेच्या वतीने दि २३ एप्रिल मंगळवारी फुलेपिंपळगाव येथे आयोजित १५ व्या शिवार साहित्य संमेलनाच्या समारोप सत्रात प्रा.डॉ.वैशाली गोस्वामी बोलत होत्या.यावेळी व्यासपीठावर संमेलनाध्यक्ष अनिलकुमार साळवे, स्वागताध्यक्ष जगदीश पोपळे ,मसापचे अध्यक्ष मुकुंदराज सोळंके, प्रा.स्नेहल पाठक प्रा.डॉ. भाऊसाहेब राठोड, किशोर गुंजकर बालासाहेब झोडगे, प्रा.डॉ.उमेश साडेगावकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना प्रा. डॉ.वैशाली गोस्वामी म्हणाल्या की, निसर्गासोबत राहिल्यामुळे आपली निसर्गाशी नाळ जुळत असते. आपण बोली भाषेसाठी उपक्रम केले पाहिजेत. संत साहित्य वाचले पाहिजे. मुक्त वातावरणात जगत असताना संत साहित्याकडे वळले पाहिजे. संत दासोपंत प्राकृत, संस्कृत,



ब्रज, फारशी अशा अनेक भाषेत बोलत. यामुळे दासोपंत हे बहुभाषिक होते. माणसाचे साहित्य हे महत्त्वाचे आहे. कविता निर्माण होण्यासाठी शब्दांची गरज असते. शब्दांना विचारांची गरज असते. साहित्याच्या संदर्भाने आज रणधुमाळी माजली आहे. आज माणसातील विद्वेष कमी करण्याची गरज आहे . आपण जे वाचतो ते सकारात्मक असले पाहिजे. त्यातून प्रेरणा मिळाली पाहिजे .जगण्याच्या धारणा आणि धोरण आपल्याला साहित्यातून मिळते . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. स्नेहल पाठक यांनी केले. अध्यक्षीय समारोप संमेलनाध्यक्ष अनिलकुमार साळवे यांनी केला. यावेळी खालील ठराव घेण्यात आले. १) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात यावा. २) केसापूरी येथील पुरातन ,भग्न केशवराज मंदिराचे पुनर्निर्माण करण्यास ९ .५० कोटींचा निधी महाराष्ट्र शासनाने मंजूर केला आहे. याबद्दल महाराष्ट्र शासनाचे आभार. या नूतनीकरणास गती यावी आणि हा पुरातन वास्तूचा ठेवा जतन व्हावा. ३) माजलगावला प्रस्तावित असलेले नाट्यगृहाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे. ४) नाट्यगृहाला प्रा. श्याम पाठक यांचे नाव

### पंधराव्या शिवार साहित्य संमेलनाचा समारोप

देण्यात यावे व तेथे प्रा. श्याम पाठक यांचा पुतळा बसविण्यात यावा. ५) ग्रामीण भागातील लहान साहित्य संमेलनांना शासनाने अनुदान द्यावे. या ठरावाचे वाचन बालासाहेब झोडगे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रवीण काळे यांनी केले तर आभार सखाराम जोशी यांनी मांनले. यावेळी गौरी देशमुख, स्मिता लिंबगावकर, प्रा. सिद्धार्थ तायडे , रानबा गायकवाड, बा. सो. कांबळे , प्रा. हिरामण डावरे, बालाप्रसाद चव्हाण, भारत सोळंके, गोविंद गोचडे, प्रमोद काळे, मोहन राठोड ,प्रतिभा थिगळे, डॉ.मीनाक्षी निळेकर प्रा. संगीता जाधव, प्रकाश पत्की, विशाल वायाळ, खेलबा काळे , वैभव सोळंके, रोमेश पोपळे, सोमेश पोपळे यांच्यासह साहित्यप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. माजलगाव येथील ग्रुरूकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथील प्रा. निखिल जाधव यांना भारत सरकारचे पेटंट मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

## बाबुशेठ होनराव यांचे निधन



**बीड । प्रतिनिधी**

शिरुर तालुक्यातील मानूर येथील नागनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव बाबुशेठ महारुद्र आप्पा होनराव यांचे बुधवारी (दि.२४) रोजी जम्मू काश्मिर येथे हृदयविकाराने निधन झाले. मृत्यू समयी ते ७५ वर्षांचे होते. बाबुशेठ होनराव हे माँ वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी गेले होते. जम्मू काश्मिर येथे असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला. तातडीने त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले. त्यांचे पार्थिव मानूर येथे आणले असून शुक्रवारी (दि.२६) सकाळी ८ वाजता त्यांच्या राहत्या घरापासून अंत्ययात्रा निघणार असून ९.३० वाजता मानूर येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यविधी करण्यात येणार आहे.

## तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते दिव्यांग मतदार जनजागृती फेरीचे उदघाटन

**बीड । प्रतिनिधी**

३९-बीड लोकसभा सार्वत्रिक निवडणूक च्या अनुषंगाने बीड जिल्हयातील दिव्यांग मतदाराचे १००% मतदान व्हावे या करीता बीड तालुक्यातील सर्व दिव्यांग शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, दिव्यांगासाठी काम करणा-या स्वयंसेवी संस्था व संघटना यांच्या समेवत दिव्यांग मतदार जन जागृती फेरीचे आयोजन आज करण्यात आले.

बीड तालुक्याचे तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी व जिल्हा दिव्यांग नोडल अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प. बीड, आर.एम.शिंदे यांच्या हस्ते दिव्यांग मतदार जनजागृती फेरीस हिरवा झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली. फेरीचा मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड ते छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा ते पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड असा होता.

दिव्यांगाचे १००% मतदान व्हावे यासाठी घोषणा फलक घेऊन तसेच चित्ररथाच्या माध्यमातुन मतदान जागृती तसेच प्रचार व प्रसार करण्यात आला. सर्व नागरीकांनी मतदान आवश्यक करावे, असे आवाहन करण्यात आले. मतदार जागृती फेरी सामाजिक न्याय भवन मध्ये परत आल्यावर बीड तालुक्याचे तहसीलदार श्री. कुलकर्णी यांनी मतदारांसाठी प्रतिज्ञा वाचन केले व लोकशाहीमध्ये सर्वानी मतदान करणे आवश्यक असल्याचे उपस्थितांना सांगीतले. फेरीसाठी वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता श्री.नखाते ए.बी., श्री. कुलकर्णी अलोक यांनी परिश्रम घेतले. मतदार जागृतीसाठी जागतिक दर्जाचे सुप्रसिद्ध व्यंग चित्रकार सुहास पालीमकर यांनी आकर्षक चित्ररथ व घोषणा फलक तयार केले. सोमवार दि.१३ में २०२४ रोजी सर्व मतदारांनी मतदान करण्याचे आवाहन या माध्यमातुन करण्यात आले.

## मतदान केंद्रावर एएमएफ सुविधा देण्यासाठी कक्षाची स्थापना

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांनी निवडणुकीच्या कामासाठी विविध कक्षांची स्थापना केली आहे. मतदान केंद्रावर ए.एम.एफ. सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्थापन करण्यात करण्यात आलेल्या कक्षाची कक्षाच्या प्रमुख म्हणून असून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर सहाय्यक कक्ष प्रमुख म्हणून जिल्हा परिषदेचे बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता बी. एम. राजपूत यांची नियुक्ती

**कक्ष प्रमुखपदी संगीतादेवी पाटील**

करण्यात आली आहे. या कक्षासाठी परिविक्षाधीन मुख्याधिकारी ऋतुजा पाटील, आणि व्ही. एस जाधव, सोनल काळे यांच्यासह राहुल जाधव, ए.बी. महाडिक, पी.डी. जाधव यांचाही समावेश आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनानुसार सर्व मतदान केंद्रावर मतदारासाठी ए एम एफ सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तालुका न्याय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या पक्षाच्या कक्ष प्रमुख प्रकल्प संचालिका संगीता देव पाटील यांनी या सर्व अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची बैठक बैठक घेतली. सर्व संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांनी सर्व मतदान केंद्रावर मतदानाच्या दिवशी पुरविण्यात येणाऱ्या सुविधा सुविधांची सविस्तर माहिती दिली सदर सुविधा देण्यासाठी सर्वांनी कसोशीने प्रयत्न करून सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत ची कार्यवाही करून घ्यावी असे आवाहन सदर बैठकीत केले. तसेच तालुकास्तरावरील सर्व अधिकाऱ्यामार्फत मतदान केंद्रावर देण्यात येणाऱ्या सुविधा देण्याबाबतचे पत्र निर्गमित करून सुविधा देण्याबाबतची कार्यवाही काटेकोरपणे करावी असे आवाहन श्रीमती पाटील यांनी केले आहे.

## बाल वैज्ञानिक पृथ्वीराज राणेची राष्ट्रीय प्रदर्शनासाठी निवड

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पोद्दार इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये इयत्ता आठवी मध्ये शिकणारा पृथ्वीराज भाऊसाहेब राणे या बाल वैज्ञानिकाची निवड इन्स्पायर अवार्ड राष्ट्रीय प्रदर्शनासाठी झाली आहे . यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज कराड येथे नुकतेच राज्यस्तरीय इन्स्पायर प्रदर्शन संपन्न झाले या प्रदर्शनामध्ये महाराष्ट्रातून १५० विद्यार्थी सहभागी झाले होते या प्रदर्शनात पृथ्वीराज ने तयार केलेल्या ग्रामीण भागातील लोकांसाठी उपयुक्त असणाऱ्या स्मार्ट अडॅप्टरची निवड दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय प्रदर्शनासाठी झाली आहे पृथ्वीराजला विज्ञान शिक्षक भाऊसाहेब राणे यांचे मार्गदर्शन लाभले आहे .

डॉ.दीपक पिंजारी प्रोफेसर इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबई , डॉ.राधा आतकरी मॅडम संचालक राज्य विज्ञान संस्था नागपूर , दिलीप चव्हाण संचालक शिवाजी शिक्षण संस्था विद्यानगर कराड , डॉ. विरल चौधरी ,अनंत गुप्ता शास्त्रज्ञ नॅशनल इनोव्हेशन फाउंडेशन गांधीनगर यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन पृथ्वीराज राणे याला सन्मानित करण्यात आले. इन्स्पायर अवार्ड मानक ही केंद्र शासनाची महत्त्वकांशी योजना आहे विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग भारत सरकार यांच्यातर्फे २०१२ पासून ही योजना देशांमध्ये सुरू आहे.

## निवडणूक निरीक्षक अजिमूल हक यांनी घेतली जिल्हा निवडणूक अधिकारी यांची भेट

**बीड । प्रतिनिधी**

३९-बीड लोकसभा मतदारसंघांचे निवडणूक निरीक्षक अजिमुल हक आजपासून बीड दौऱ्यावर असून त्यांनी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांची आज भेट घेतली.

यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी श्री. हक यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी श्री. हक यांना ३९ बीड लोकसभा मतदार संघात आतापर्यंत निवडणुकीच्या अनुषंगाने झालेले कामकाजाची माहिती दिली.




नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून याबाबतचीही माहिती निवडणूक निरीक्षक श्री. हक यांना दिली. नामनिर्देशन अर्ज स्वीकारण्याच्या दरम्यान जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या समवेत काही वेळ त्यांच्या कक्षात श्री. हक उपस्थित होते.

श्री. हक भारतीय प्रशासकीय सेवेतील दिल्ली कॅडरचे अधिकारी आहेत. ते बीड लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निरिक्षक म्हणून नियुक्त झालेले असून त्यांचा संपर्क क्रमांक ९४०४५९२५११ हा आहे. ते शासकीय विश्रामगृहात थांबणार आहेत. सर्वसामान्यांना भेटण्यासाठी निवडणूक निरीक्षकांची वेळ सायंकाळी ५:०० ते ६:०० वाजेपर्यंत असणार आहे त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश मोकाटे आहेत.

## श्रीपाद लिंबेकर यांची शास्त्रीय संगीत सभा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



कलावंत

श्री श्रीपाद लिंबेकर, पुणे

येथील संगीत साधना मंचच्या वतीने शास्त्रीय संगीत साधक व रसिकांसाठी मासिक सभा होणार असून २७ एप्रील शनिवार रोजी होणाऱ्या सभेत पुणे येथील प्रख्यात गायक श्रीपाद लिंबेकर यांचे गायन होणार आहे खोलेश्वर महाविद्यालयात सायंकाळी साडेसहा वाजता होणाऱ्या या मासिक संगीत सभेचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने विश्वजीत धाट,रत्नदीप शिंगे, प्रफ्फुल्ल दहिवाळ प्रा.डॉ.संपदा कुलकर्णी, प्रार्थना चौभारकर आदींनी केले आहे.

## मतदार जागृती सायकल मार्ग

**बीड । प्रतिनिधी**

रविवारी दिनांक २८ एप्रिल रोजी सकाळी सात वाजता मतदान जागृती साठी सायकल रॅली काढण्यात येणार आहे. या सायक्लोथॉन ची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून करण्यात येणार आहे.




जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनातून स्वीप उपक्रमांतर्गत रविवारी २८ एप्रिल रोजी मतदान जागृतीसाठी सायक्लोथॉनचे आयोजन करण्यात आले आहे.

या सायकल रॅलीमध्ये जिल्हा प्रशासनाचे अधिकारी,कर्मचारी तसेच महसूल, पोलीस, जिल्हा परिषद सायकल संघटनेचे सदस्य यासह लायन्स क्लब, रोटरी क्लब, महिला सायकल संघटनेचे सदस्य ही असणार आहेत. जास्तीत जास्त मतदार नागरिकांनी या सायक्लोथॉनचा भाग होऊन 'मी मतदान करणार' असा संदेश द्यावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केले आहे. असा असेल मतदार जागृतीचा सायकलमार्ग सामाजिक न्याय भवन पासून सायक्लोथॉनची सुरुवात होईल पुढे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून अन्ना भाऊ साठे चौक ते सुभाष रोड ते हिरालाल चौक ते बलभीम चौक ते बशीर गंज ते सिव्हिल हॉस्पिटल ते माने कॉप्लेक्स ते नाट्यगृह ते नगर नाका ते भगवान बाबा चौक ते जिजामाता चौक ते डॉक्टर लाईन मार्गे शेवटी सामाजिक न्याय भवन येथे या मतदार जागृती सायक्लोथॉनचे समापन होईल.

## सांगवी पाटण येथे भैरवनाथ यात्रा उत्साहात संपन्न.. दर्शन घेण्यासाठी नाद भक्तांनी केली अलोट गर्दी

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाणारे भैरवनाथ मंदिर असून येथील यात्रेमध्ये २२ एप्रिल रोजी श्रीक्षेत्र पैठण,नागतळा येथून आलेल्या कावडीची मिरवणूक काढण्यात आली. २३ एप्रिल रोजी सकाळी वाजत गाजत शेरणी, दंडवत, लोटांगण घेऊन भाविक भक्तांनी नवस पूर्ण केले, तीन ते सहा यावेळेस मुख्य आकर्षण, बँजो, डिजे, डोल, ताशा . लेझिम , हलगी पथक,युवकांचा डान्स, भव्य दिव्य काठी मिरवणूक कार्यक्रम संपन्न झाला , रात्री सहा ते आठ यावेळेस अंबिल घुगऱ्या वाटण्याची जुनी परंपरा अजूनही



कायम आहे. नंतर रात्री छबिना काढून गावात रातभर मिरवणूक काढण्यात आली , पहाटे शोभेच्या दारूची आतिश बाजी करण्यात आली, यावेळी बघणाऱ्यांच्या डोळ्याचे पारने,फिटले यात्रेमध्ये खेळणी दुकाने, खाऊची दुकाने, महाप्रसादाची दुकाने असे अनेक प्रकारचे दुकाने थाटली गेली होती, यात्रेमध्ये भावी नवरदेव यांनी दर्शनासाठी जास्त गर्दी केली होती,नंतर कुस्त्याचा हंगामा संपन्न होणार झाला यामध्ये शेवटची कुस्ती उद्योजक पांडुरंग सोनवणे व यांच्या हस्ते लावण्यात आली,पंचक्रोशीतील पाटण, कोहिनी, खीळद, लिंबोडी, बावी,डोईठाण, सुरुडी, धामणगाव, कारखेल, लमाणतांडा, पुणे, मुंबई, अहमदनगर, तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविक भक्तांनी भैरवनाथांचे दर्शन घेतले , अशाप्रकारे सांगवी पाटण गावची यात्रा गुण्यागोविंदाने ,मिळून मिसळून साजरी झाली.

## शिवार साहित्य संमेलनात प्रा निखिल जाधव सन्मानीत

**माजलगाव । प्रतिनिधी**

मराठवाडा साहित्य परिषद आयोजित १५ वे शिवार साहित्य संमेलन फुलेपिंपळगाव शिवारात मराठी कला रसिकांच्या साक्षीने उत्साहात पार पडला. या वेळी कार्यक्रमाच्या चौथ्या सत्रात मसाप च्या माजलगाव शाखा उपाध्यक्षा प्रा. स्नेहल पाठक यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की मराठी साहित्या बरोबर येथील भूमिपुत्रांचा सत्कार गौरव झाला पाहिजे असे प्रतिपादन कले त्याचबरोबर शिवार साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा.डॉ. अनिलकुमार साळवे प्रमुख पाहुण्या साहित्यिक प्रा. वैशाली गोस्वामी यांनी गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे प्राध्यापक निखिल निळकंठ जाधव यांना भारत सरकारचे पेटंट मिळाल्याबद्दल प्रा. निखिल जाधव यांचा कुटुंबा समवेत



पत्नी गायत्री जाधव आई कवी संमेलनाच्या अध्यक्षा प्रा. संगीता जाधव सत्कार केला. मसाप माजलगाव चे सहकार्यवाहक संजय झोडगे यांनी प्रा. निखिल जाधव यांचा परिचय करून देताना सांगितले की प्रा. जाधव सरांनी 'रक्तातील कोलस्टेरॉलची पातळी मोजण्याच्या यंत्रावर संशोधन केले आहे' यासाठी त्यांना भारत सरकारचे पेटंट (मालकी हक्क) मिळाले. या उपकरणाचा फायदा हृदयविकार, किडणीविकार, मधुमेह, रक्तदाब असलेल्या रुग्णांना होवुशकतो असे सांगितले. यावेळी मंचावर शिवार साहित्य संमेलनाचे सर्व मान्यवर स्वागताध्यक्ष जगदीश पोफळे, मसाप माजलगाव शाखेचे अध्यक्ष मुकुंदराज सोळंके, उपाध्यक्ष प्रा. स्नेहल पाठक, कार्यवाहक प्रा. डॉ. भाऊसाहेब राठोड, सहकार्यवाहक बाळासाहेब झोडगे आणि प्रा. डॉ. उमेश साडेगावकर , कोषाध्यक्ष किशोर गुंजकर सर्व कार्यकारणी सदस्य उपस्थित होते.

## महिला महाविद्यालयात माजी विद्यार्थिनी मेळावा संपन्न

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

येथील कै . लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात माजी विद्यार्थिनी मेळावा आयोजित करण्यात आला . या विद्यार्थिनी मेळाव्यासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा . प्रसादजी देशमुख उपस्थित होते तर अध्यक्षा म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ . विद्याताई देशपांडे या उपस्थित होत्या. या मेळाव्यात महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी समितीच्या अध्यक्षा मधुरा कुलकर्णी , सचिव - स्वाती भोसले यांची व तसेच माजी विद्यार्थिनी समितीच्या सदस्या असलेल्या अनेक विद्यार्थिनींची देखील उपस्थिती होती.

या मेळाव्याच्या प्रारंभी सर्व मान्यवरांचे व माजी विद्यार्थिनींचे




स्वागत करण्यात आले . त्यानंतर आपल्या प्रास्ताविकपर भाषणात प्रा.डॉ. विवेकानंद कवडे यांनी माजी विद्यार्थ्यांच्या जबाबदाऱ्या व त्यांची कार्ये काय असतात याविषयी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर स्वतःचे अनुभव देखील त्यांनी मांडले.

यानंतर माजी विद्यार्थिनी समितीच्या अध्यक्षा मधुरा कुलकर्णी आणि समितीच्या सचिव स्वाती भोसले या दोघींनीही याप्रसंगी आपले मनोगत मांडताना आपण सर्वतोपरी महाविद्यालयाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील राहू असे आश्वासक उद्गार काढले . महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी कु .दीपाली मुळे हिने महाविद्यालयात शिक्षण घेताना तिला आलेल्या अनुभवांना उजाळा दिला . तिला शिक्षकांनी केलेले साह्य आणि या महाविद्यालयात आलेले अनुभव याचे सविस्तर विवेचन केले. या महाविद्यालयासारखे महाविद्यालय परिसरात कुठे आढळून येत नाही असेही ती म्हणाली.संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा.प्रसादजी देशमुख यांनी आपल्या मनोगतात या मेळाव्याचे महत्त्व प्रतिपादन करून महाविद्यालयातून बाहेर पडलेल्या माजी विद्यार्थिनींना हे महाविद्यालय सदैव सहकार्य करीत राहील आणि कधीही गरज पडली तरी महाविद्यालयाकडे या , तुम्हाला सहकार्य करायला आम्ही सदैव तत्पर आहोत असे प्रतिपादन केले . त्यानंतर कार्यक्रमाच्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ .विद्याताई देशपांडे यांनीही माजी विद्यार्थिनींना संबोधित केले . त्यात त्या म्हणाल्या की हे महाविद्यालय म्हणजे तुमचे माहेरघर आहे . कधीही केव्हाही कोणत्याही अडचणी असतील तर महाविद्यालयात या महाविद्यालय तुमच्या पाठीशी आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा . डॉ .अरुण चव्हाण यांनी केले तर डॉ.नेरकर एस. एस. यांनी आभार मानले . या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी माजी विद्यार्थिनी मेळाव्याचे संयोजक प्रा.डॉ.जोशी आर. एल. व प्रा.डॉ.पाध्ये मॅडम यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

cmyk

राज्य लोकतंत्र

शेत-शिवार

शुक्रवार दि.२६ एप्रिल २०२४



# दुग्ध व्यवसायातून मासिक साडेचार लाखांची कमाई!

मुंबई : राज्यात दुग्ध व्यवयासाने शेतकऱ्यांना मोठा आधार दिला आहे. दुष्काळ, नापिकी, बाजारभाव न मिळणे आणि अवकाळी पाऊस यामुळे शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नसले तरी अनेक शेतकरी आपली प्रगती साधत आहे.

तुकाराम शहापूरकर असे या शेतकऱ्याचे नाव असून, ते जालना तालुक्यातील निधोना परिसरातील आंबेडकरनगर येथील रहिवासी आहेत. शेतकरी तुकाराम शहापूरकर यांनी केवळ शेतीच्या मागे न लागता, आपला दुग्ध व्यवसाय विस्तारला आहे. त्यांना आपल्या शेतीमध्ये नेहमीच आर्थिक नुकसान सहन करावे लागत होते. कधी दुष्काळ, कधी अवकाळी पाऊस तर कधी बाजारभाव न मिळणे, यामुळे ते त्रस्त होते. ज्यातून मार्ग काढण्यासाठी त्यांनी डेअरी व्यवसायाची कास धरत, मोठी प्रगती साधली आहे.

शेतकरी तुकाराम शहापूरकर सांगतात, गोठ्यातील ४० म्हशींचे सकाळी १५० आणि सायंकाळी १०० लिटर दूध मिळते. विशेष म्हणजे ते आपले दूध कोणत्याही दूध संघाला न घालता, आपल्या दुचाकीद्वारे जालना शहरातील विविध हॉटेल आणि घरोघरी जाऊन थेट विक्री विकतात.



त्यांना आपल्या म्हशीच्या दुधाला एक लिटरला ६० ते ७० रुपये याप्रमाणे दर मिळतो. अर्थात २५० लिटर दूध दररोज मिळत असल्याने, त्यांना २५० लिटर दुधाला ६० ते ७० रुपये दर याप्रमाणे एका दिवसाला १५ हजार रुपयांची कमाई होत असल्याचे ते सांगतात.

चारा, वैरणीवर ४००० रुपये खर्च...

सध्याच्या घडीला दुग्ध व्यवसायामध्ये त्यांनी हळूहळू प्रगती करत, मोठी उंची गाठली आहे. आपल्या ४० म्हशींसाठी त्यांनी आधुनिक गोठा उभारला आहे.

याशिवाय आपल्या ४० म्हशींसाठी ते दिवसभरात ओला चारा, पेंड, मुरघास यासाठी जवळपास चार हजार रुपये खर्च करतात. हा खर्च वगळता दिवसाला त्यांना म्हशींच्या दुध विक्रीतून १५ हजार रुपये नफा तर महिनाकाठी साडेचार लाख रुपयांचे निव्वळ उत्पन्न मिळत असल्याचे ते सांगतात.

## धान अनुदान, सव्वा लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर हेक्टरी २० हजार रुपये जमा!

राज्यात सध्या दुष्काळ, अवकाळी, अतिवृष्टी या साऱ्या नैसर्गिक संकटांसह शेतमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी बेजार झाले आहे. अशातच आता शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. गेल्या वर्षी झालेल्या हिवाळी अधिवेशनात शिंदे सरकारने राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी २०,००० रुपये एवढे बोनस देण्याचे जाहीर केले होते. अर्थात अलीकडेच त्याबाबत जीआर देखील जारी करण्यात आला होता. ज्यात राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याला दोन हेक्टरच्या मर्यादेत बोनसची ही रक्कम दिली जाणार आहे.

धान अर्थातच भात हे महाराष्ट्रात उत्पादित होणारे एक महत्त्वाचे पीक आहे. याची लागवड पावसाळ्यात अर्थातच खरीप हंगामात केली जाते. राज्यातील विदर्भ विभाग हा धान उत्पादनासाठी अर्थातच भात उत्पादनासाठी विशेष ओळखला जातो. सरकारच्या माहितीनुसार, एका शेतकऱ्याला कमाल चाळीस हजार रुपयांपर्यंतचा बोनस मिळणार आहे. त्यानुसार, गोंदिया या प्रमुख धान उत्पादक जिल्ह्यांमधील पात्र धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनसची रक्कम मिळाली आहे. असे शेतकऱ्यांकडून सांगितले जात आहे.

२३६ कोटी रुपये वितरित

राज्यातील ज्या धान उत्पादक शेतकऱ्यांनी सरकारच्या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी केलेली होती. त्यांना ही बोनसची रक्कम वितरित करण्यात आली आहे. खरेतर या बोनससाठी गोंदिया जिल्ह्यातील १ लाख २२ हजार ८१४ शेतकरी पात्र ठरले आहेत. दरम्यान, या पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना आता प्रोत्साहन अनुदान अर्थातच बोनस वितरित केला गेला आहे. असल्याचे सरकारी पातळीवरून सांगण्यात आले आहे. या संबंधित पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर बोनसचे २३५ कोटी ७६ लाख रुपये जमा करण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे.

रकमेत हेक्टरी ५००० रुपये वाढ

मागील वर्षी राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी १५००० रुपये आणि २ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत बोनस वितरित करण्यात आला होता. यंदा मात्र बोनसची रक्कम ५००० रुपयांनी वाढवली गेली आहे. राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी २०००० रुपये एवढी रक्कम बोनस स्वरूपात दिली जात आहे.

दरम्यान, गोंदिया जिल्ह्यातील पात्र १ लाख २० हजार ८५५ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग धानाच्या बोनसची रक्कम पाठवण्यात आली आहे. तर उर्वरित १९५९ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर देखील लवकरच बोनसची रक्कम जमा केली जाणार आहे. त्यामुळे खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना भांडवलासाठी मोठा दिलासा मिळणार आहे.



## राज्यातील २१ साखर कारखान्यांना कर्जाची हमी; आर्थिक मदत मिळणार!

पुणे : राज्यासह देशभरात सध्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. अशातच आता राज्यात लोकसभा निवडणुक आचारसंहिता लागू होण्यापूर्वी राज्य सरकारने, राज्यातील २१ साखर कारखान्यांना कर्ज देण्याची हमी दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता राज्य सरकारच्या या निर्णयांमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या राज्यातील २१ साखर कारखान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. राज्य सरकारने महिनाभरापूर्वी कर्जाची हमी दिल्यानंतर सहकार विभागाने कारखान्यांची यादी देखील तयार केली असल्याचे सांगितले जात आहे.

एका इंग्रजी वृत्तसमूहाच्या माहितीनुसार, राज्य सरकारकडून कर्जाची देण्यात आलेल्या २१ कारखान्यांपैकी १५ कारखाने हे राजकीय नेत्यांकडून सांभाळले जात आहेत. हे १५ राजकीय नेते सत्तेत सहभागी झाले आहेत. तर या कारखान्यांपैकी दोन कारखाने शिंदे गटाच्या नेत्याकडून सांभाळले जात आहेत. पाच कारखाने हे अजित पवारांकडून सांभाळले जात आहेत. तर एक कारखाना हा काँग्रेस नेत्याकडे असून, त्यांनी निवडणुकीपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. तर एक कारखाना हा सोलापूरमधील माजी आमदार भारत भालके यांचे सुपूत्र सांभाळत आहेत. भारत भालके हे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार होते. सहा कारखाने हे सत्ताधारी पक्षांमधील एक जोडपे सांभाळत आहेत. एका कारखाना हा काँग्रेस नेत्याचा आहे. तर दोन कारखाने हे अपक्ष नेत्यांकडून सांभाळले जात आहेत. तर एक कारखाना हा राजकीयदृष्ट्या तटस्थ नेत्यांकडून सांभाळला जात आहे. राज्यातील बहुतांश सहकारी कारखाने हे आमदार , खासदार आणि मंत्र्यांकडून सांभाळले जातात. मात्र, राज्यातील सर्व सहकारी साखर कारखान्यांना कर्जाची हमी मिळालेली नाही.

८९७.६५ कोटींचा कर्ज पुरवठा

गेल्या सप्टेंबर महिन्यात फक्त पाच कारखान्यांना महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून १७८.२८ रुपये कर्जाची हमी मिळाली. तर २०२२-२३ या वर्षात या बँकेने ३४ कारखान्यांना ८९७.६५ कोटींचा कर्ज पुरवठा केला होता. त्यापैकी १७८.२८ कोटी रुपयांची कर्ज हमी ही सहा कारखान्यांना दिली होती. सहकारी कारखाने कर्जाद्वारे एकूण १०००० कोटी रुपये उभारतात, अशी माहिती उद्योगक्षेत्रातुन सांगितली जात आहे.

## हायड्रोपोनिक पद्धतीने स्ट्रॉबेरी लागवड

शेती करत असताना माती आणि पाणी नसेल तर शेतीमध्ये पिके मिळवण्याबाबत कल्पनाच केली जाऊ शकत नाही. मात्र, शेतीमध्ये सध्या नवनवीन तंत्रज्ञानाचा शिरकाव होत असून, शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात उत्पादन मिळवणे शक्य झाले आहे. विशेष म्हणजे शेतकरी हायड्रोनिक्स या तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती करत, विना मातीचे मोठी कमाई करत आहे. एका शेतकऱ्याने हायड्रोनिक्स तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती करत, स्ट्रॉबेरी पिकाचे उत्पादन घेतले आहे. ज्यातून त्याला लाखो रुपयांची कमाई झाली आहे.

धीरज वर्मा असे या शेतकऱ्याचे नाव असून, तो उत्तर प्रदेशमधील बाराबंकी जिल्ह्यातील रहिवासी आहे. धीरज वर्मा हा बीएस्ससी पदवीधर असून, त्याने शिक्षणानंतर नोकरीच्या मागे न लागता शेतीची वाट धरली. त्यासाठी त्याने पॉलीहाऊस उभारून हायड्रोपोनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती करण्याचा निर्धार केला. यासाठी त्याने महाराष्ट्रातील महाबळेश्वरसारख्या थंड हवेच्या ठिकाणी येणाऱ्या स्ट्रॉबेरी या पिकाची निवड केली. विशेष म्हणजे विना माती आणि अगदीच कमी पाण्यात त्याने स्ट्रॉबेरीचे हे उत्पादन घेतले आहे.



हायड्रोपोनिक प्रकारची शेती ही इस्राएलमध्ये मोठ्या प्रमाणात केली जाते. या पद्धतीमध्ये केवळ पाण्यावर पिके घेतली जातात. शेतकरी धीरज वर्मा यांनी हीच हायड्रोपोनिक पद्धत वापरून स्ट्रॉबेरीची रोपे लावली आहेत. साधारणपणे त्यांना एका हंगामामध्ये धीरज वर्मा यांनी पाच टन स्ट्रॉबेरीचे उत्पादन काढले आहे. याच स्ट्रॉबेरीच्या उत्पादनातून त्यांना आतापर्यंत एकूण तीन लाख रुपयांचा नफा देखील झाला आहे. सध्या त्यांच्या स्ट्रॉबेरी पिकाची काढणी सुरु असून, त्यांना त्यातून आणखी नफा मिळणार असल्याचे ते सांगतात.

महाराष्ट्राच्या मातीतील पीक

स्ट्रॉबेरी हे एक बेरी वर्गीय फळ आहे. हे एक लहान आकाराचे फळ असून लाल रंगाचे फळ आहे. ते थंड प्रदेशात होते. सुगंध, लाल रंग, रसाळपणा आणि गोडपणा यामुळे हे फळ प्रसिद्ध आहे. स्ट्रॉबेरीमध्ये कर्बोहायड्रेटस जीवनसत्त्व 'क' , 'ब' आणि कॅल्शियम, लोह, स्फुरद इत्यादी घटक भरपूर प्रमाणात असतात. साधारणपणे महाराष्ट्रातील महाबळेश्वर स्ट्रॉबेरीच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे.

## राज्यात सोयाबीन, तुरीला किती मिळतोय दर?

राज्यात सध्या राजकीय वातावरण चांगलंच तापल्याचं आपल्याला पाहायला मिळत आहे. पण दुसरीकडे मात्र नागरिकांना पाण्यासाठी वणवण फिराव लागत असल्याच चित्र देखील आता काही भागात दिसून येत आहे. सध्या राज्याच्या बहुतांश भागात पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे.


कोकणात उष्णतेची लाट येण्याची शक्यता

राज्यात मागील काही दिवसांपासून अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. यासोबत वातावरणात देखील सातत्याने बदल होत आहे. याचदरम्यान राज्यात पुहा दोन दिवस पावसाचा इशारा हवामान खात्याकडून जारी करण्यात आला आहे. तर दुसरीकडे राज्यातील बहुतांश भागांमध्ये तापमान ३७ अंशांच्याही पलिकडे पोहोचलं आहे. तर मुंबईसोबत कोकणात तुरळक क्षेत्रात उष्णतेची लाट येण्याची शक्यता देखील हवामान खात्याने दिली आहे. तर दुसरीकडे मध्य महाराष्ट्रात एक दोन ठिकाणी रात्रीच्या वेळी उष्ण वातावरण होण्याची शक्यता आहे.

तसंच मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज देखील हवामान खात्याकडून व्यक्त करण्यात आला आहे.

पाण्यासाठी नागरिकांची वणवण

राज्यात सध्या राजकीय वातावरण चांगलंच तापल्याचं आपल्याला पाहायला मिळत आहे. पण दुसरीकडे मात्र नागरिकांना पाण्यासाठी वणवण फिराव लागत असल्याच चित्र देखील आता काही भागात दिसून येत आहे. सध्या राज्याच्या बहुतांश भागात पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. तब्बल १ हजार ८०० हून अधिक गावे आणि ४ हजार पेक्षा जास्त वाड्या वस्त्यांवर पाणीटंचाईचे भीषण संकट ओढवले आहे. यामुळे येथिल नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे.





लातूर बाजार समितीत माथाडी कामगारांचा बंद

लातूर बाजार समितीतील माथाडी कामगारांनी दरवाढ मिळावी यासाठी बंद पुकारला आहे. यामुळे मागील चार दिवसांपासून बाजार समिती शेतमाल खरेदी विक्री बंद आहे. तसंच दरवाढीच्या होणाऱ्या बैठकीला व्यापारी देखील उपस्थित राहत नसल्याने कामगारांनी शेवटी बंदचा निर्णय घेतला आहे. लातूर बाजारात सोयाबीन, तूर, गहू या शेतमालाची आवक मोठ्या प्रमाणात होत असते. पण कामगारच नसल्याने शेतकऱ्यांना आणि नागरिकांना बाजार सुरु होण्याची वाट पाहावी लागत आहे.

सोयाबीनचे दर नरमलेलेच, शेतकरी चिंतेत

राज्यात अद्यापही सोयाबीनला समाधानकारक भाव मिळत नाही. यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. काल मंगळवारी राज्यभरात ३२ हजार २३९ क्विंटल सोयाबीनची आवक झाली आहे. या सोयाबीनला सरासरी ४ हजार १०० ते ४ हजार ४०० रुपयांचा दर मिळाला आहे. तर या हंगामात सोयाबीन ५ हजार रुपये क्विंटलचा टप्पा ओलाडेल असा अंदाज होता. पण तस झालं नाही यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकरी आता दरामुळे चिंतेत आहेत.

तूर ११ हजारांच्या पुढे, शेतकरी समाधानी

राज्यात तूर उत्पादक शेतकऱ्यांना यंदा मात्र चांगला दिलासा मिळाला आहे. बाजारात तुरीला जवळपास ११ हजारांच्या पुढे दर मिळत आहे. यामुळे तूर उत्पादक शेतकरी समाधानी असल्याचं दिसून येत आहे. तर काल मंगळवारी राज्यभरात २२ हजार ५७० क्विंटल तुरीची आवक झाली. या तुरीला बाजारात १० हजार ते ११ हजार रुपये क्विंटलचा भाव मिळाला आहे. यामुळे तुर उत्पादक शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर एक समाधान दिसून येत आहे




### महत्वाच्या घटना

१४७८ : इटलीतील पाझींनी फ्लोरेन्समध्ये चर्चमधील रविवारच्या सामूहिक प्रार्थने दरम्यान लॉरेन्झो दि मेदिची वर हल्ला केला. लॉरेन्झोचा भाउ ज्युलियानी मृत्युमुखी पडला.
१६०७ : इंग्लंडचे काही वसाहती केप हेन्री, व्हर्जिनिया येथे पोचले. यांनी पुढे जेम्सटाउन शहर वसवले.
१६५४ : यहुदी लोकांना ब्राझील देशातून बाहेर काढून देण्यात आलं.
१७५५ : रशियातील जुन्या प्रख्यात मॉस्को विद्यापीठाची स्थापना.
१८०२ : नेपोलियन बोनापार्टने फ्रेंच क्रांतीत देशाबाहेर पळून गेलेल्या जहागिरदारांना माफी जाहीर केली व परत फ्रांसमध्ये बोलावले.
१८४१ : साली बॉम्बे गॅझेट या इंग्रजी वृत्तपत्राची स्थापना मुंबई येथे करून त्यांचे वृत्तपत्राचे प्रकाशण सर्वप्रथम एका रेशमी कापडावर करण्यात आले.
१८६५ : अमेरिकन यादवी युद्ध दक्षिणेच्या जनरल जोसेफ जॉन्स्टनने उत्तरेच्या विल्यम टेकुमेश शर्मन समोर उत्तर कॅरोलिनातील ड्युरॅम येथे शरणागती पत्करली.
१८६५ : अब्राहम लिंकनची हत्या करून पळालेल्या जॉन विल्कस बूथला सैनिकांनी ठार केले.
१९०३ : अटलेटिको माद्रिद असोसिएशन फुटबॉल क्लबची स्थापना झाली.
१९०३ : महात्मा गांधी यांनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीय लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी वकिली सुरु केली. तसचं त्यांनी त्या ठिकाणी ब्रिटीश इंडिया असोसिएशनची स्थापना केली.
१९२५ : पॉल फोन हिंडेनबर्ग वायमार प्रजासत्ताकच्या राष्ट्राध्यक्षपदी.
१९३३ : जर्मनीची गुप्त पोलिस यंत्रणा गेस्टापोची रचना.
१९३७ : जर्मनीच्या लुफ्तवाफेने स्पेनच्या गर्निका शहरावर बॉम्बफेक केली. याचे परिणाम पाहून ख्यातनाम चित्रकार पाब्लो पिकासोने गर्निका हे जगप्रसिद्ध चित्र काढले.
१९४२ : मांचुरियाच्या हॉन्केइको कोलियरी या कोळशाच्या खाणीत स्फोट. १,५४९ कामगार ठार. आत्तापर्यंतचा खाणीत झालेला हा सगळ्यात मोठा अपघात आहे.
१९५६ : भारतातील पहिल्या वृत्तपत्रकागदाच्या कारखान्याचे पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते उदघाटन.
१९६२ : नासाचे रेंजर ४ हे चांद्रयान चंद्रावर कोसळले.
१९६४ : टांगानिका व झांझिबार देश एकत्र आले.
१९७० : सुवेझ कालवा भागामध्ये पुन्हा एकदा चकमकी सुरू झाल्या. इजिप्त व इस्त्रायल यांचे हवाई हल्ले सुरू झाले. एकमेकांविरुद्धचे शत्रुत्व आणि विभागीय सत्ता संतुलन, हक्क यासाठी सशस्त्र संघर्ष सुरू.
१९७३ : अजित नाथ रे भारताचे १४ वे सरन्यायाधीश झाले.
१९८६ : युक्रेनमध्ये चर्नोबिल अणु भट्टीत अपघात. घातक किरणोत्सर्गाने युरोप, एशियातील अनेक देश प्रभावित.
१९८९ : बांगलादेशमधे चक्रीवादळामुले सुमारे १,३०० लोक ठार, १२,००० जखमी आणि ८०,००० बेघर झाले.
१९९४ : चायना एरलाइन्सचे एरबस ए-३००जातीचे विमान जपानच्या नागोया विमानतळावर कोसळले. २६४ ठार.
१९९५ : आशियाई विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या निशा मोहोताने इंटरनॅशनल वुमन मास्टर किताब मिळवला.
२००२ : जर्मनीच्या एरफर्ट शहरात रॉबर्ट स्टाइनहाउझरने आपल्या शाळेतील १३ शिक्षक, २ विद्यार्थी व १ पोलिस अधिकार्याला ठार मारले.
२००५ : २९ वर्षांनी सिरियाची लेबेनॉनमधून माघार.
२००८ : जम्मू काश्मीर राज्यात निर्मित ३९० मेगावॅट क्षमता असलेला दुल हस्ती हायडल पॉवर प्रकल्प तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी देशाला समर्पित केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७९ : वल्लभाचार्य, कृष्णभक्तीचा एक वेगळा पंथ पुष्टिमार्ग स्थापन करणारे थोर पुरुष.
१८६४ : स्वामी दयानंद सरस्वती यांचे शिष्य तसचं, आर्य समाजातील प्रमुख पाच नेत्यांपैकी एक पण्डित गुरुदत्त विद्यार्थी यांचा जन्मदिन.
१८९४ : रुडॉल्फ हेस, नाझी अधिकारी.
१९०० : चार्ल्स रिश्टर, अमेरिकन भूशास्त्रज्ञ.
१९०८ : सर्वमित्र सिकरी, भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश.
१९१७ : आय.एम.पै, अमेरिकन स्थापत्यविशारद.
१९४० : भारतीय मोल्वी आणि राजकारणी मोल्वी इफ्तिखार हुसैन अन्सारी यांचा जन्म. (मृत्यू: ३० सप्टेंबर २०१४)
१९४८ : अभिनेत्री मौशमी चटर्जी यांचा जन्म.
१९५३ : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री मौसमी चटर्जी याचा जन्मदिन.
१९६३ : जेट ली, चीनी अभिनेता.
१९७० : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची पत्नी मेलानिया ट्रम्प यांचा जन्म.
१९८७ : प्रसिद्ध भारतीय चित्रपट निर्देशक, छायाचित्रकार व लेखक नितीन बोस यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

११९२ : गो-शिराकावा, जपानी सम्राट.
१४८९ : अशिकागा योशिहिसा, जपानी शोगन.
१९२० : श्रीनिवास रामानुजन, प्रसिध्द गणितज्ञ.
१९२४ : रमाबाई महादेव रानडे.
१९७६ : साहित्यिक चिंतामणी त्र्यंबक खानोलकर ऊर्फ आरती प्रभू यांचे निधन. (जन्म: ८ मार्च १९३०)
१९८२ : प्रतिष्ठीत भारतीय हिंदी कवी, लेखक व आलोचक मलयज यांचे निधन.
१९८७ : शंकर-जयकिशन या जोडीतील संगीतकार शंकरसिंग रघुवंशी यांचे निधन. (जन्म: ५ ऑक्टोबर १९२२)
१९९९ : लोकशाही पद्धतीने निवडण्यात आलेले नेपाळचे पहिले पंतप्रधान मनमोहन अधिकारी यांचे निधन. (जन्म: २० जून १९२०)
२०१० : राजस्थान राज्याच्या माजी राज्यपाल प्रभाराव याचं निधन.

cmyk

# ग्रामसडक योजनेंतर्गत रस्ते ग्रामस्थांसाठी की राजकीय पदाधिकारी पोसण्यासाठी?:डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

तत्कालीन ग्रामविकासमंत्री तथा पालकमंत्री बीड पंकजाताई मुंडे यांनी महायुती सरकारच्या सन २०१४ ते २०१९ कालावधीत १९३३ किलोमीटर लांबीचे रस्ते बांधण्यासाठी साधारण ११८६ कोटी रूपयांच्या प्रशासकीय मान्यता मिळवल्या. मात्र बीड जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था बीड यांच्या मार्फत करण्यात आलेले बहुतांश रस्त्यांची कामे त्यांच्या पक्षाच्या पदाधिकारी अथवा नातेवाईकांच्या नावे असणा-या कन्स्ट्रक्शन कंपनीने ग्रामीण रस्ते विकास संस्थेच्या आधिका-यांशी आर्थिक हितसंबंध जोपासत अंदाज पत्रकाप्रमाणे न करता अत्यंत निकृष्ट दर्जाचे केलेली असुन वर्षभरातच खड्डे पडले असुन आता रस्ता खचल्याने मोठमोठी भगदाडे पडली असुन अपघातांना निमंत्रण ठरत आहेत मात्र कंत्राटदार याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत. त्यामुळे सध्या मतदान मागण्यासाठी येणाऱ्या पंकजाताईंना मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्ते ग्रामस्थांसाठी की राजकीय पदाधिकारी पोसण्यासाठी असा जाब विचारणार आहेत.



ग्रामसडक योजनेंतर्गत रस्ते ग्रामस्थांसाठी की राजकीय पदाधिकारी पोसण्यासाठी असा जाब विचारणार आहेत.

बीड तालुक्यातील बीड पालवण चौक ते लिंबागणेश प्राजिमा ३१ जवळ ते आहेर धानोरा ते वरवटी,भाळवणी,बेलेश्वर चौक ते लिंबागणेश एकुण २७ किलोमीटर लांबीच्या अंदाजे किंमत १२ कोटी ७५ लाख रुपये किंमतीच्या रस्त्याचे काम एम.टी.मस्के कन्स्ट्रक्शन बीड या कंपनी मार्फत अत्यंत निकृष्ट करण्यात आले असुन अंदाजपत्रका प्रमाणे काम करण्यात आलेले नसुन अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आलेले असल्याने जागोजागी खड्ड्यांची थातुरमातुर डागडुजी केल्यामुळे ठिगळे लावलेली दिसुन येतात तर काही ठिकाणी भगदाड पडलेले असुन अपघातांना निमंत्रण असतानाही दुरुस्ती करण्यात येत नाही. निकृष्ट रस्ता प्रकरणात डॉ.गणेश ढवळे यांनी पुराव्यानिशी लेखी तक्रार केल्यानंतर कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बीड यांनी संबंधित प्रकरणी कार्यकारी अभियंता मुख्यमंत्री ग्रामसडक योजना बीड यांना उचित कार्यवाही करण्याबाबत पत्रव्यवहार केला असता कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो) महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था बीड यांनी सदर रस्त्याचे काम एम.टी.मस्के कन्स्ट्रक्शन कंपनी बीड यांच्या मार्फत पुर्ण झाले असुन सदर रस्त्याचे काम अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार झालेले असुन कामावर वेळोवेळी वरीष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक यांनी तपासणी केली असुन काम समाधानकारक असल्याचा शेरा दिलेला आहे त्यामुळे तक्रारींमध्ये तथ्य नसल्याचा जावई शोध कामाची तपासणी न करताच लावला आहे. बालाघाटावरील बहुतांश रस्ते पंकजाताई मुंडे यांच्या पक्षाच्या पदाधिकारी व त्यांच्या नातेवाईकांच्या कन्स्ट्रक्शन कंपनीकडून अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असुन पालवण ते लिंबागणेश रस्ता भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांचे थोरले बंधु एम.टी.मस्के कन्स्ट्रक्शन बीड कडुन करण्यात आला असून निवडणुकीत मतदान मागण्यासाठी येणाऱ्या पंकजाताईंना पालवण,आहेर धानोरा,वरवंटी,भाळवणी, पोखरी (घाट),पिंपरनई,बेलेश्वर,सोमनाथवाडी येथील ग्रामस्थ रस्ते ग्रामस्थांसाठी की राजकीय पदाधिकारी पोसण्यासाठी असा जाब विचारणार असल्याची संतप्त भावना बोलावून दाखवली.

# विहिरीतून पाणी काढताना महिलेचा पाय घसरला

शिरूर । प्रतिनिधी

एप्रिल महिन्यातच तालुक्यातील नागरिकांना पाणी टंचाईच्या झळया जाणवू लागल्या असून पाणी टंचाईचा सामना करण्याची लढाई सुरू झाली आहे.तालुक्यातील हिंगेवाडी येथील एका महिलेचा विहिरीतील पाणी काढत असताना पायरी वरुन पाय घसरून पडल्याने मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी सकाळी नऊ वाजण्याच्या दरम्यान घडली आहे.पाणी टंचाईचा सामना करत असताना महिलेचा पहिला बळी गेला असून भविष्यात पाणीप्रश्न किती गंभीर असणार आहे याची जाणीव करून देणारा आहे.तालुक्यातील हिंगेवाडी येथील चंद्रकला दगडू फुलमाळी वय ४० वर्षे रा.हिंगेवाडी या आपल्या पुतण्यासोबत पाणी आणण्यासाठी विहिरीवर गेल्या होत्या.या वेळी विहिरीतील तुटलेल्या पायरीवरुन पाय निसटल्याने त्या खाली पडल्या.सदरील प्रकार त्यांचा पुतण्या भरत याने पाहिल्यानंतर तो घराकडे पळत गेला आणि घडलेला प्रकार सांगितला.या वेळी आजूबाजूचे लोक विहिरीकडे पळाले.परंतु तो पर्यंत मृतदेह विहिरीच्या तळाला गेला होता.घटनेची माहिती मिळताच सामाजिक



कार्यकर्ते अजिनाथ गवळी यांनी घटनास्थळी धाव घेत कुटुंबीयांना धीर दिला आणि मृतदेह पुढील प्रक्रियेसाठी शिरूरच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविला

मयत चंद्रकला दगडु फुलमाळी यांचे पती मानसिकदृष्ट्या आजारी असून संपूर्ण कुटुंबाचे पालनपोषण करण्याची जबाबदारी हि चंद्रकला यांच्यावरच होती.आपला पारंपारिक व्यावसाय सांभाळत त्या कुटुंबाची उपजीविका चालवत होत्या.परंतु या घटनेत त्यांचाच मृत्यू झाल्यामुळे संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले असून कुटुंबाचा आधारच गेला आहे. तालुक्यात पाणीप्रश्न गंभीर बनलेला असताना प्रशासन मात्र निवडणुका आणि बैठकांच्या कामात व्यस्त दिसत आहे.या धावपळीत पाणीप्रश्न किती महत्वाचा आहे आणि त्याला प्राधान्य दिले पाहिजे हे देखील प्रशासन विसरून गेले असल्याचे नागरिक बोलत आहेत.

# शिरापूर येथे बालसंस्कार शिबिराचे आयोजन-निळकंठ महाराज

आष्टी । प्रतिनिधी

मुलांना स्वावलंबी होण्यासाठी केळसांगवी येथील भागवताचार्य ह.भ.प.निळकंठ महाराज तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी १ ते १६ मे २०२४ या कालावधीत संत मदन महाराज गुरुकुल विद्यापीठ वारकरी शिक्षण संस्थेतर्फे आष्टी तालुक्यातील शिरापूर येथे भव्य बालसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबीराच्या समारोपानिमित्त दि.१५ मे रोजी रात्री ह.भ.प.रामदास डोरले महाराज यांचे हरिकीर्तन तर दि.१६ मे रोजी सकाळी १० ते १२ यावेळात भागवताचार्य ह.भ.प.निळकंठ महाराज तावरे यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. या शिबिरात मुले सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत स्वतःची कामे स्वतः करतात. यामुळे मुले स्वावलंबी होण्यास मदत होते.

उन्हाळ्याची सुट्टी आहे म्हणून मुले रात्री उशिरापर्यंत (मोबाईल ) टि.व्हि.वरील मालिका,सिनेमे पाहत बसतात आणि सकाळी उशिरा उठतात.यामुळे त्यांची शारीरिक हानी होते.बालसंस्कार शिबिरात मुलांना सकाळी लवकर उठून प्राणायाम आणि व्यायाम शिकवला जातो.उन्हाळ्याच्या सुट्टीत आपल्या मुलाने नवीन काहीतरी शिकावे असे सर्व पालकांना वाटते परंतु त्यासाठी योग्य असा पर्याय सापडत नाही.आष्टी तालुक्यातील केळसांगवी येथील श्री संत मदन महाराज गुरुकुल विद्यापीठ वारकरी शिक्षण संस्थेतर्फे गेली १३ वर्षापासुन उन्हाळी बालसंस्कार शिबीर आयोजित केले जाते.या बालसंस्कार शिबिरात पखवाज वादन,शास्त्रीय संगीत गायन,हार्मोनियम,तबला आदि विषय शिकविले जातात.धार्मिक क्षेत्रातील दिग्गज व्यक्ती या शिबिरातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.या शिबीरातील विद्यार्थ्यांकरिता शिरापूर, आनंदवाडी,सराटेवडगांव ग्रामस्थांनी सहकार्य केलेले आहे.उदार दानशूर व्यक्तींना तावरे महाराज यांचे आवाहन आहे की, गुरुकुलातील व शिबीरातील विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी व शिक्षणासाठी ज्या ज्या गोष्टीची कमतरता असेल त्या बाबी उदार व दानशुर व्यक्तींनी या विद्यार्थ्यांकरीता, गुरुकुलाच्या विकासाकरिता मदत करावी.चांगले शिक्षण मिळण्यासाठी तसेच जे शिक्षण आळंदी,पंढरी, पैठण येथे प्राप्त होते तेच शिक्षण या श्री संत मदन महाराज गुरुकुल विद्यापीठ वारकरी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून भागवताचार्य निळकंठ महाराज तावरे यांच्या माध्यमातून उपलब्ध आहे.आष्टी तालुक्यामध्ये ही गुरुकुल संस्था म्हणजे बीड जिल्ह्यामध्ये दुसऱ्या क्रमांकावर २०१६ पासून ही संस्था कार्य करत आहे. बालसंस्कार शिबिराचे कार्य २०१३ पासून सुरु आहे म्हणून सर्व समाज घटकांनी याकडे लक्ष देऊन गुरुकुलाच्या अडचणी सोडविण्यासाठी मदत करावी तसेच या बालासंस्कार शिबीराचा लाभ बहुसंख्य विद्यार्थ्यांनी घ्यावा असेही आवाहन भागवताचार्य ह.भ.प. तावरे महाराज यांनी केले आहे.

# पीक विमा नुकसान मागणी अर्जाचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

जिल्हयात प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत हवामान आधारित फळपीक विमा योजनेसाठी एचडीएफसी एर्गो जनरल इंन्सुरन्स कंपनी लि. नियुक्त आहे. सध्या अवकाळी पाऊस, गारपीट, जोराचा वारा, विजा पडणे अशा स्वरुपाचे हवामान असून तसा इशारा भारतीय हवामान विभागामार्फत देण्यात आलेला आहे.

संभाव्य नुकसानीच्या पार्श्वभूमीवर फळपीक विमा योजना, रब्बी हंगाम (अंबिया बहार) मध्ये ज्या शेतक-यांनी सहभाग घेतला आहे. व ज्यांचे गारपीट (द्राक्ष) व जोराचा वारा (आंबा, केळी) नुकसान झाले आहे. अशा शेतक-यांना पीक नुकसानीची तक्रार द्यावी लागते यासाठी खाली दिलेल्या माध्यमातुन ७२ तासाच्या आत शेतक-यानां तक्रार करता येईल. फळपिक विमा कंपनीला तक्रार देण्यासाठी कृषी व शेतकरी कल्याण विभागा विभागामार्फत विकसित क्रॉप इन्शुरन्स अप्लिकेशन पुढील लिंकव्दारे गुगल प्ले स्टोर वरुन लाऊनलोड करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी बी.के. जेजुरकर यांनी केले आहे. अप्लिकेशनचा वापर करुन त्याव्दारे माहिती द्यावी. अधिक माहितीसाठी खालील विमा प्रतिनिधी यांच्याशी संपर्क साधावा.

जिल्हा प्रतिनिधी अविनाश खेडकर मोबाईल क्र. ९०७५४९५०००, बीड अविनाश खेडकर ९०७५४९५०००, आष्टी- अविनाश खेडकर मोबाईल क्र. ९०७५४९५०००, पाटोदा- अविनाश खेडकर मोबाईल क्र. ९०७५४९५०००, शिरुर कासार- अविनाश खेडकर मोबाईल क्र. ९०७५४९५०००, माजलगाव- बाबासाहेब वायभासे मो. क्र. ९९७०७१५७७२, गेवराई- बाबासाहेब वायभासे मो. क्र. ९९७०७१५७७२, वडवणी- बाबासाहेब वायभासे मो. क्र. ९९७०७१५७७२, धारूर- स्वप्नील खेडकर मो. क्र.९४०५९१५९४७, अंबाजोगाई- स्वप्नील खेडकर मो. क्र.९४०५९१५९४७, परळी- स्वप्नील खेडकर मो. क्र.९४०५९१५९४७ आणि केज- स्वप्नील खेडकर मो. क्र.९४०५९१५९४७ यावर संपर्क साधावा.

# धारूर महाविद्यालयाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालय नाव बदलास मंजुरी

धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या नाव बदलास महाराष्ट्र शासनाने मंजुरी देऊन राजमाता जिजाऊ महाविद्यालय, किल्ले धारूर अशी मान्यता दिली आहे. महाविद्यालयाच्या नाव बदलास मिळालेल्या मंजुरी बद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष म. प्रकाश सोळंके, सचिव मा. सतीश चव्हाण, महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख सदस्य मा. . जयसिंग सोळंके, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य . लोभाजी चव्हाण, अजयसिंह दिख्खत, महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य डॉ. राम शिनगारे,. इं. ना. जाधव तसेच मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सर्व सदस्य याबरोबरच धारूर शहरातील पत्रकार बंधू, सुजान नागरिक, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, आजी विद्यार्थी या सर्वांनी महाविद्यालयाच्या नाव बदलाविषयी केलेल्या प्रयत्नांना यश मिळाले. यामुळे महाविद्यालयाचे नाव राजमाता जिजाऊ महाविद्यालय, किल्ले धारूर असे ओळखले जाणार आहे. महाविद्यालयाच्या नाव बदला संबंधी शासन स्तरावर केलेल्या प्रयत्नांना यश मिळाल्याने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांचे सर्वांनी अभिनंदन करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक विकासाबरोबरच राजमाता जिजाऊ मांसाहेब यांच्या विचारांना व व्यक्तित्वाला अनुरूप कार्य करणार असल्याचे सांगितले. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सिद्धेश्वर काळे, महाविद्यालयातील सर्व वरिष्ठ, कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचेही अभिनंदन सर्व स्तरातून होत आहे.

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१३२/२०२४**
**अभिषेक पि. गिन्यानदेव मोरे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, रौळसगाव ता. जि. बीड**
**पहा अभिषेक पि. गिन्यानदेव मोर रा. रौळसगाव ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत पंढरी दुर्गाजी मोरे यांचा दिनांक १६/०६/१९१० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास रौळसगाव ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे रौळसगाव ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २३/४/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २७/५/२०२४ ही आहे.**

स्वाक्षरित
**तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१३१/२०२४**
**दत्तात्र्य पि.आसाराम उबाळे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, चऱ्हाटा ता. जि. बीड**
**पहा दत्तात्र्य पि.आसाराम उबाळे रा. चऱ्हाटा ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत देवराव पि.तुकाराम उबाळे यांचा दिनांक १२/०४/१९०२ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास चऱ्हाटा ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे चऱ्हाटा ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २३/४/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २७/५/२०२४ ही आहे.**

स्वाक्षरित
**तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१३०/२०२४**
**भारत पि. बबन काशिद विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, साक्षाळपिंप्री ता. जि. बीड**
**पहा भारत पि. बबन काशिद रा. साक्षाळपिंप्री ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत बापु नाथाजी काशिद यांचा दिनांक १९/०५/१९५० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास साक्षाळपिंप्री ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे साक्षाळपिंप्री ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २३/४/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २७/५/२०२४ ही आहे.**

स्वाक्षरित
**तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१२९/२०२४**
**मच्छिंद्र पि. बाबुराव ढवळे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, भाळवणी ता. जि. बीड पहा**
**मच्छिंद्र पि. बाबुराव ढवळे रा.सुर्याचीवाडी ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत तात्या मारोती ढवळे यांचा दिनांक २५/१२/१९०८ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास भाळवणी ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे भाळवणी ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २२/४/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २७/५/२०२४ ही आहे.**

स्वाक्षरित
**तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१२८/२०२४**
**भालचंद्र पि.संतराम खांडे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, पिंपळगाव (मजरा)ता. जि. बीड**
**पहा भालचंद्र पि. संतराम खांडे रा. पिंपळगाव मंजरा ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत सजनजी राघोजी खांडे यांचा दिनांक ०७/११/१९१८ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास पिंपळगाव (मजरा) ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे पिंपळगाव मंजरा ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २४/४/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २७/५/२०२४ ही आहे.**

स्वाक्षरित
**तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१२७/२०२४**
**तुकाराम पि. दशरथ पवार विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, वंजारवाडी ता. जि. बीड**
**पहा तुकाराम पि.दशरथ पवार रा. वंजारवाडी ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत नारायण पि. महादू पवार यांचा दिनांक ०८/१०/१९२८ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास वंजारवाडी ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे वंजारवाडीव ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २४/४/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २७/५/२०२४ ही आहे.**

स्वाक्षरित
**तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१२६/२०२४**
**बंडु पि.श्रीरंग घिगे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय अव्वलपुर/सोनगाव ता.जि. बीड**
**पहा बंडु पि.श्रीरंग घिगे ता. जि. बीड** उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत भनाजी पि.हरिभाऊ घिगे दिनांक ०१/०१/१९३६ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास सोनगांव ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे अव्वलपुर/सोनगाव ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २४/४/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २७/५/२०२४ ही आहे.**

स्वाक्षरित
**तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१२५/२०२४**
**सतिष पि. उत्तम ढवळे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय भाळवणी ता.जि. बीड**
**पहा सतिष पि. उत्तम ढवळे रा. भाळवणी ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत नामजी मारोती ढवळे यांचा दिनांक २०/११/१९१२ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास भाळवणी ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे भाळवणी ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २४/४/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २७/५/२०२४ ही आहे.**

स्वाक्षरित
**तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१२४/२०२४**
**बाबासाहेब पि. सुदाम आंबरुळे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय भाळवणी ता. बीड**
**पहा बाबासाहेब पि. सुदाम आंबरुळे रा. सुर्याचीवाडी ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत बालाजी गेणू आंबारुळे यांचा दिनांक १५/०५/१९१० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास भाळवणी ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे भाळवणी ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २२/४/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २७/५/२०२४ ही आहे.**

स्वाक्षरित
**तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१२३/२०२४**
**बंकट ज्ञानोबा घोरड विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, ब्रम्हगाव ता. जि. बीड**
**पहा बंकट ज्ञानोबा घोरड रा. ब्रम्हगांव ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत यशवंत पि रामचंद्र घोरड यांचा दिनांक १२/०२/१९०५ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास ब्रम्हगाव ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे ब्रम्हगांव ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २४/४/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २७/५/२०२४ ही आहे.**

स्वाक्षरित
**तहसिलदार, बीड**

दैनिक राज्य लोकतंत्र
महासंग्राम
शुक्रवार दि. २६ एप्रिल २०२४ | ६

# चारशे पार होणार नाही म्हणणाऱ्या पोपटांना खानदेशी जनता उत्तर देईल

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना धारेवर धरले



**जळगाव । प्रतिनिधी**

ही निवडणूक कोणी उमेदवाराची नसून एका सर्वसामान्य माणसाला पुन्हा पंतप्रधान बनवायचे आहे. संविधानामुळेच आपण देशाचे नेतृत्व ठरवणार आहोत. ना की राजाचा मुलगा राजा होणार, त्यामुळे संविधानात दिलेल्या अधिकाराचा उपयोग करून आपल्याला पुन्हा पंतप्रधानपदी मोदींना बसवायचे आहे. सध्या बरेच पोपट तयार झालेले आहेत व ते म्हणतात की ४०० पार होणार नाही. या पोपटांना आपल्या मतदानातून ही खानदेशी जनता उत्तर देईल असा घणाघात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. जळगाव येथे झालेल्या स्वातंत्र्य चौकातील सभेमध्ये ते बोलत होते.

रावेर व जळगाव लोकसभेच्या उमेदवारांनी गुरूवारी उमेदवारी अर्ज दाखल केले. दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज दुपारी अडीच वाजता जळगावला आले. स्वातंत्र्य चौकात झालेल्या सभेमध्ये बोलताना ते म्हणाले की, मोदींचा नाराच आहे, सबका साथ सबका विकास त्यामुळे सर्वसामान्यांपासून शेतकरी, मजुरांपर्यंत सर्वांचा विकास करण्यासाठी आपल्याला पुन्हा महायुतीच्या सरकारला मतदान करायचे आहे. शेतकऱ्यांना वाचवण्यासाठी कापूस व सोयाबीनीला इतर शेतमालाला भाव मिळावा म्हणून मोदींनाच पंतप्रधान करावयाचे आहे. शेतकऱ्यांना त्या व्यतिरिक्त चार हजार कोटी दिले आहेत मात्र आचारसंहिता लागल्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यावर टाकता येत नाही अशी माहिती त्यांनी दिली. देशातील १२ बलुतेदारांचा विचार करणारे हे पहिले केंद्रातील सरकार आहे. त्यासाठी १२ हजार कोटी रुपये दिले आहे असेही ते म्हणाले. आपला भारत देश मोदींमुळे सुरक्षित झालेला आहे. पूर्वी आपल्याला शस्त्र सुद्धा आयात करावी लागत होती. आपण आता स्वतः शस्त्र बनवत आहोत. देशाची अर्थव्यवस्था अधिक भक्कम होणार असल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### मोदी देशाला सुपर पॉवरकडे नेणारे नेतृत्व–गिरीश महाजन

जळगाव जिल्हा हा बदला घेणारा जिल्हा आहे. त्यामुळे जळगावची जनता ही १३ तारखेला आपल्या मतदानाच्या पेटीतून ते दाखवून देणार आहे. विरोधकांनी भाडे देऊन लोक बोलवली होती मात्र ही मोदींवर प्रेम करणारी जनता आहे. त्यामुळे इतक्या उन्हातही या ठिकाणी आलेली आहे. आज सध्या देशात एकमेव नेतृत्व म्हणजे नरेंद्र मोदी. देशाला सुपर पॉवर कडे नेणारे नेतृत्व असल्याचे वक्तव्य गिरीश महाजन यांनी केले.

### पाकीस्तानही घाबरु लागला– गुलाबराव पाटील

पूर्वी पाकिस्तानी ही आपल्याला डोळे वटारून बघत होतो. मात्र आज नरेंद्र मोदींच्या कार्यकाळात पाकिस्तान आपली शेपूट घालून बसलेला आहे. आपल्याकडे अत्याधुनिक असे ब्रह्मास्त्र सारखे हत्यारे असल्यामुळे तेही घाबरू लागलेले आहेत. मोदीजींनी सर्वसामान्यांपासून आपल्या संपूर्ण देशाचा विकास केला आहे.

# बजरंग सोनवणेंचा अंबाजोगाई शहरात डोअर टू डोअर प्रचार सुरू

## माजी आ. पृथ्वीराज साठेंनी घेतल्या मतदारांच्या भेटी



**बीड/अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे व इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार बजरंग बाप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ माजी आ. पृथ्वीराज साठे यांनी मित्र पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन अंबाजोगाई शहरात मतदारांच्या भेटी घेत डोअर टू डोअर प्रचार सुरू केला.

बीड लोकसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी शरद गटाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बाप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ माजी आमदार पृथ्वीराज साठे हे केज विधानसभा मतदार संघातील गावा – गावात जाऊन मतदारांच्या भेटी घेत आहेत. गुरुवारी माजी आ. पृथ्वीराज साठे यांनी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, डॉ. नरेंद्र काळे यांच्या मित्र पक्षाचे पदाधिकारी व महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांसह अंबाजोगाई शहरात आई योगेश्वरी देवीचे दर्शन घेऊन प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. त्याचबरोबर दर्गा येथे चादर चढवून बजरंग बाप्पांच्या विजयासाठी दुवा मागितली. त्यानंतर शहरातील मंडी बाजार, पाटील चौक, बाराभाई गल्ली ते पटाईत गल्ली, दमगाण पुरा ते मणियार गल्ली,भुई गल्ली आदी भागात जाऊन डोअर टू डोअर प्रचार करीत नागरिकांशी सवांद साधून बजरंग बाप्पांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले.

यावेळी माजी आ. पृथ्वीराज साठे यांनी बोलताना बजरंग बाप्पा सोनवणे हे आपल्या हक्काचं, सर्वसमावेशक व सुसंस्कृत नेतृत्व आहे. त्यांना संसदेत पाठविण्यासाठी तुतारी या चिन्हासमोरील बटण दाबून मतदानरुपी आशीर्वाद द्यावेत. असे आवाहन घरोघरी मतदारांशी सवांद साधून केले. यावेळी शहरातील इंडिया आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# माथेपर पामडी डीलेपर शेला घालन पंकजाताई बीड जिल्हारे विकासेसारू हम ताईन दिल्लीन मेलीयाँ



अ.भा. बंजारा क्रांती दलाच्या वतीने महायुतीच्या उमेदवार लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचे स्वागत

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांनी बुधवार दि. २४ एप्रिल रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी उमेदवारी अर्ज दाखल करतांना जिल्हाभरातून असंख्य कार्यकर्त्यांनी, संघटनांनी लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचे स्वागत केले. दरम्यान, कार्यक्रमाचे आयोजन भुषण पवार यांनी केले.

अ.भा. बंजारा क्रांती दलाचे प्रदेश कार्याध्यक्ष मधुकर राठोड ,अ भा बंजारा क्रांती दल महासचीव शरद राठोड व आयोजक भुषण पवार यांच्या वतीने लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचे बीड येथे भव्य स्वागत करण्यात आले. बीड लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार लोकनेत्या पंकजाताई मुंडे या आपला उमेदवारी अर्ज दाखल करण्याकरिता बीड येथे आल्या असता त्यांच्या स्वागतासाठी जिल्हाभरातून असंख्य कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. याच पार्श्वभुमीवर स्वागत रैली मधुकर राठोड,शरद राठोड तसेच आयोजक भुषण पवार यांच्यासह असंख्य बंजारा बांधवांच्या वतीने लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचे पुष्पहार व बंजारा समाजाची पारंपारिक वेशभुषा असलेली पामडी प्रदान करुन स्वागत करण्यात आले. बंजारा समाजाची ताकद नेहमीच लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहीलेली आहे. त्यांच्या पश्चातही लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचे हात बळकट करण्यासाठी अखिल भारतीय बंजारा क्रांती दलाचे शरद राठोड व त्यांचे पदाधिकारी अहोरात्र परिश्रम घेत आहेत. प्रा पि टी चव्हान रोहीदास चव्हान आर डी नायक बबीता राठोड पारूबाई राठोड माऊली राठोड विशाल राठोड यावेळी भाऊसाहेब राठोड, अनिता जाधव, कैलास चव्हाण, रमेश पवार, प्रभाकर राठोड, प्रमोद पवार रोहिदास चव्हाण, अविनाश आडे, रोहीत पवार अभय राठोड प्रमोद होळंबे अमोल चव्हान ओमप्रकाश गिरी राजु पवार हरी नवले आदींसह अनेकजण मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व समाज बांधवांचे भुषण पवार यांनी आभार मानले.

# निवडणूक आयोगाची नरेंद्र मोदींच्या विरोधातील तक्रारीबद्दल नड्डा यांना नोटीस



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

केंद्रीय निवडणूक आयोगाने भाजपा अध्यक्ष जे पी नड्डा यांना नोटीस बजावून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्याच्या तक्रारींवर पक्षाचे उत्तर मागितले आहे. ईसीआयने भाजपला २९ एप्रिलपर्यंत उत्तर देण्यास सांगितले आहे.

अशीच नोटीस काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना भाजपाने राहुल गांधींविरोधात केलेल्या तक्रारींवरून बजावली होती. निवडणूक आयोगाने दोन्ही पक्षाध्यक्षांना पाठवलेल्या पत्रांमध्ये नरेंद्र मोदी, राहुल गांधी किंवा मल्लिकार्जून खर्गे यांचे थेट नाव नव्हते, परंतु त्यांना मिळालेली निवेदने संबंधित पत्रांशी जोडलेली होती आणि त्यात तिन्ही नेत्यांवरील आरोपांचा तपशील होता. केंद्रीय निवडणूक आयोगने लोकप्रतिनिधी कायद्याचे कलम ७७ लागू केले आहे आणि स्टार प्रचारकांवरील वक्तव्याची जबाबदारीही पक्षाध्यांवर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे स्टार प्रचारांवर नियमाचे उल्लंघनप्रकरणी पहिली पायरी म्हणून पक्षाध्यक्षांना जबाबदार धरले आहे.

"स्टार प्रचारकांनी नेहमी संपूर्ण भारतीय दृष्टीकोन ठेवावा आणि निवडणूकीच्या प्रचारात योग्य पध्दतीचे योगदान देणे अपेक्षित आहे, जे कधीकधी स्थानिक पातळीवर राजकिय पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार करताना आणि राजकिय वातावरणात आक्रमकता जोष निर्माण करण्यासाठी विकृत शब्दांचा किंवा कृत्याचा आधार घेतला जातो. अशा प्रकारे, स्थानिक पातळीवर जोषाची परिस्थितीच्या नावाखाली परिस्थितीला वेगळेच वळण लागून मोहिमेची तीव्रता विस्कळीत होते किंवा अनवधानाने अशा सीमा ओलांडते तेव्हा सुधारात्मक कृती किंवा एक प्रकारचा उपचारात्मक स्पर्श प्रदान करणे ही स्टार प्रचारकांकडून अपेक्षा आहे," असे मत वरिष्ठ प्रधान सचिव नरेंद्र एन. बुटोलिया यांनी जे पी नड्डा यांना पत्रात लिहिले. "त्यामुळे स्टार प्रचारकांनी "राजकीय पक्षांच्या कार्यक्रमाचा प्रचार" करण्यासाठी या विशेषाधिकाराचा उपयोग करणे अपेक्षित आहे आणि म्हणूनच, प्रचाराच्या ठिकाणी त्यांच्या भाषणांना अनुपालनाच्या उच्च दर्जात्मक उंबरठ्यावर न्याय देणे आवश्यक आहे," असेही ते म्हणाले. ईसीआयने २३ एप्रिल रोजी सांगितले की, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजस्थानमधील एका सभेत केलेल्या भाषणाच्या विरोधात केलेल्या तक्रारीची तपासणी करेल जिथे त्यांनी म्हटले होते की केंद्रात सत्तेवर निवडून आल्यास विरोधी काँग्रेस मुस्लिमांमध्ये सोने लोकांच्या मालमत्ता, जमिन मालमत्तांचे वाटप करेल.दुसरीकडे, भाजपाने निवडणूक आयोगाला लिहिले होते की, राहुल गांधी यांनी तामिळनाडूतील कोईम्बतूर येथे भाषणादरम्यान मोदींवर अत्यंत वाईट आणि अत्यंत वाईट आरोप केले. खर्गे यांनी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींशी भेदभाव केल्यामुळे त्यांना राम मंदिर अभिषेक सोहळ्याला आमंत्रित करण्यात आले नाही असा दावा करून आदर्श संहितेचे उल्लंघन केल्याचा आरोपही केला.

# पालकमंत्र्यांचा बहुरंगीपणा जिल्ह्याला नव्हे, उभ्या महाराष्ट्राला माहीत आहे

## इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचे प्रतिउत्तर



**धारूर । प्रतिनिधी**

बहुरंगी कोण आहेत ? हे सांगण्याची गरज नसून आपल्या जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांचा बहुरंगीपणा जिल्ह्यालाच नव्हे, तर उभ्या महाराष्ट्राला माहीत आहे. असे प्रतिउत्तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बाप्पा सोनवणे यांनी पालकमंत्र्यांनी केलेल्या टीकेला दिले.

भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांचा उमेदवारी अर्ज भरल्यानंतर बीड येथे झालेल्या जाहीर सभेत पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्प्क्तक टीका केली होती. गुरुवारी धारूर तालुक्यात प्रचारादरम्यान फिरत असताना बजरंग बाप्पा सोनवणे यांनी पालकमंत्र्यांनी केलेल्या वैयक्तिक टिकेबद्दल त्यांचा समाचार घेताना म्हटले की, आपल्या बीड जिल्ह्याच्या पालकमंत्र्याचा बहुरंगीपणा हा फक्त बीड जिल्ह्यालाच माहीत नव्हे तर अख्या महाराष्ट्राला माहित आहे. ते किती बहुरंगी आहेत ? हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही अशी चपराक त्यांनी लगवली आहे. धारूर तालुक्यात अनेक गावांना भेटी देत बजरंग सोनवणे यांनी मतदारांशी संवाद साधला. यावेळी पक्षाचे व इंडिया आघाडीतील मित्र पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# उबाठा रंग बदलणारा सरडा, मुख्यमंत्री शिंदे यांची टीका



**मुंबई । प्रतिनिधी**

युतीमध्ये असताना उद्धव ठाकरे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे गुणगान गात होते. आता मोदी यांच्या नावाने खडे फोडत असून इतक्या झटपट रंग बदलणारा सरडा महाराष्ट्राने पहिल्यांदाच पाहिला, अशी खोचक टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली.

औरंगाबाद अर्थात छत्रपती संभाजीनगर मतदारसंघातील महायुतीचे उमेदवाराच्या प्रचारार्थ आयोजित सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. सभेपूर्वी छत्रपती संभाजीनगरातील क्रांती चौक ते गुलमंडी दरम्यान प्रचार रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत हजारोंच्या संख्येने महायुतीचे कार्यकर्ते सहभागी झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, गेल्या निवडणुकीत गडबड झाली. पण या निवडणुकीत दोघांच्या भांडणात धनुष्यबाणाला लाभ होणार आणि महायुतीचा उमेदवार प्रचंड मतांनी विजयी होणार, असा विश्वास व्यक्त करत पुढे म्हणाले की, ही निवडणूक देशाच्या विकासाची प्रगती आणि नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविण्याची आहे. बाळासाहेब ठाकरेंची घोषणा होती, गर्व से कहो हम हिंदू है, अब की बार चारसो पार मध्ये इथला उमेदवार पहिले हवेत. २०१४ नंतर दहशतवाद्यांनी बॉम्बस्फोट करण्याची हिंमत केली नाही. कारण मोदींनी दहशतवाद रोखला असा दावाही यावेळी केला. पुढे बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मोदींकडून ८० कोटी गरिबांना मोफत रेशन देण्यात येत आहे. त्यात फक्त हिंदू आहेत का? असा सवाल करत आम्हाला मिंधे म्हणतात, नीच म्हणतात, खालच्या भाषेत टीका करतात हे तुम्हाला पसंत आहे का? सर्वसामान्य शेतकऱ्याचा मुलगा मुख्यमंत्री झाला हे सहन होत नसल्याने शिवी देण्याचे प्रकार सुरु आहेत. हा शेतकरी, कष्टकरी, माता भगिनींचा अपमान आहे असा पलटवारही यावेळी केला.

# महाविकास आघाडीचे लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे प्रचंड मतांनी विजयी होणार –शेख निजाम

**बीड । प्रतिनिधी**

सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीत सर्वसामान्य कष्टकरी शेतकरी गोरगरीब नोकरदार व व्यापारी वर्गामध्ये भारतीय जनता पार्टी व मोदी सरकार विरुद्ध मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झालेला आहे याच असंतोषांमुळे भारतीय जनता पार्टी व मोदी सरकार हे यावेळी पायउतार होणार असल्याची गॅरंटी सध्या भारतातील मतदार देत असल्याचे दिसून येत आहे विशेष करून महाराष्ट्रामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते श्री शरदचंद्रजी पवार साहेब शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख श्री उद्धव बाळासाहेब ठाकरे व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांनी तिघांनी मिळून महाविकास आघाडीच्या माध्यमाने सध्या सुरू असलेल्या लोकसभेच्या रणसंग्रामामध्ये उतरलेले आहेत महाराष्ट्रातील जनतेचा महाविकास आघाडी व महाविकास आघाडीच्या सर्व लोकसभेच्या उमेदवारांना मोठा पाठिंबा मिळत असून वेगवेगळ्या झालेल्या सर्वे मध्ये सुद्धा भारतीय जनता पार्टीच्या लोकसभेच्या जागा कमी होत असल्याचे निरीक्षण नोंदवलेले आहे महाविकास आघाडी मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुखउद्धव बाळासाहेब ठाकरे व आदित्य साहेब ठाकरे हे मोठ्या जोमाने कामाला लागलेले असून त्यांच्या आदेशान्वये महाराष्ट्रातील सर्वसामान्य शिवसैनिक आपल्या जीवाची बाजी लावून पक्ष फोडणाऱ्या भारतीय जनता पार्टी आरएसएस मोदी– फडणवीस–मिंधे यांना गाडून टाकल्याशिवाय गप्प बसणार नसल्याचे चित्र सध्या दिसत आहे बीड लोकसभेच्या रणसंग्रामामध्ये एकीकडे भाजपाच्या उमेदवार यांचे बीड जिल्ह्याला कोणतेही असे भरीव काम केले नसल्याचे जाणवत असून मुंडे से कोई बैर नही भाजप अब तेरी खैर नही बीड असे वातावरण झाले आहे लोकसभेच्या रणसंग्रामामध्ये मराठा व मुस्लिम –दलीत –बहुजन समाज एकजुटीने व एक गठ्ठा मतदान महाविकास आघाडीच्या माध्यमातून महाविकास आघाडीचे उमेदवार श्री बजरंग सोनवणे यांना करणार असल्याचे दिसत आहे व त्यामुळे बजरंग सोनवणे यांचा विजय हा फक्त औपचारिकतेचाच भाग राहिलेला आहे असे सर्व सामान्य जनतेच्या प्रतिक्रिया पहावयास मिळत आहे महाविकास आघाडी चे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या बीड जिल्हा शिवसेना ताकतीने कामाला लागलेली असून मा.पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे आ.आदित्य ठाकरे साहेब याच्या आदेशावरून व बीड संपर्क नेते आ.सुनीलजी प्रभू, उपनेत्या सुषमाताई अंधारे,संपर्कप्रमुख किशोरजी पोद्दार साहेब,उप संपर्कप्रमुख मा.आ.बदाम पंडित,लोकसभा प्रमुख मा.आ.सुनील दादा धांडे, याच्या मार्गदर्शनात जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते सर,गणेश वरेकर, रत्नाकर अप्पा शिंदे यांनी आपली पूर्ण यंत्रणा कामाला लावलेली असून महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या विजयासाठी सर्व नेते मंडळी व कडवट शिवसैनिक उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा आदेशावरून कामाला लागलेले आहेत व बीड शहरात सर्वाधिक लिड देण्यासाठी शिवसेनेकडून शहरात अघाडी धर्म पाळत सर्व आघाडीतील पक्ष–नेते– कार्यकर्ते यांना सोबत घेऊन कॉर्नर बैठका, सभा,गाटीभेटी,वॉर्डात प्रचार करणार ह्यामुळे महाविकास आघाडीचा विजय होणार असल्याचे पत्रक शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बीड शहर प्रमुख शेख निजाम यांनी केले आहे.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बारामती लोकसभा मतदारसंघात मतदान टक्केवारीत वाढ होण्यासाठी जनजागृतीवर भर द्या -कविता द्विवेदी

**पुणे । प्रतिनिधी**

मतदारसंघात स्वीप उपक्रमाअंतर्गत मतदानाच्या टक्केवारीत वाढ होण्याकरीता विविध उपक्रम राबवून जनजागृती करावी; याकरीता स्थानिक प्रशासकीय यंत्रणा, सेवाभावी संस्था, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, बचत गटातील महिला आदी घटकांचा सक्रीय सहभाग घ्यावा, अशा सूचना बारामती लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी यांनी दिल्या.

विधानभवन येथे आयोजित बारामती लोकसभा मतदारसंघातील समन्वयक अधिकारी आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी समन्वयक अधिकारी हनुमंत आरगुंडे, समिक्षा चंद्राकर, अतिरिक्त समन्वयक अधिकारी विजय मुळीक, सुप्रिया डांगे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे जिल्हा अधीक्षक चरणसिंह राजपूत आदी उपस्थित होते. श्री. द्विवेदी म्हणाल्या, बारामती लोकसभा मतदारसंघातील




मतदानाची टक्केवारी कमी असलेल्या मतदान केंद्रावर येत्या ७ मे रोजी अधिकाधिक मतदान होईल, याबाबत नियोजन करावे. मतदारांना मतदान केंद्र आणि केंद्रावरील सुविधांबाबत तसेच मतदान प्रक्रियेविषयी माहिती देण्यात यावी. मतदार चिट्ठीचे वेळेत वितरण करावे. याबाबत नोंदवही अद्ययावत ठेवावी. मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी गाव पातळीवर विशेष लक्ष देऊन काम करावे. सहा पेक्षा अधिक मतदान केंद्र असलेल्या आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्यात याव्यात.

लोकसभा मतदारसंघात भरारी पथक (एफएसटी), स्थिर सर्वेक्षण पथक (एसएसटी), व्हिडीओ सर्वेक्षण पथक (व्हिएसटी), व्हिडीओ पाहणी पथक (व्हिव्हिटी), आदर्श आचारसंहिता कक्ष (एमसीसी) पथकांने देण्यात आलेल्या जबाबदारीप्रमाणे अधिक प्रभावीपणे कामे करावीत. मतदारसंघात आदर्श आचारसंहिता नियमांचे उल्लंघन होत असल्यास त्याबाबत कडक कारवाई करावी. केलेल्या कारवाईबाबत सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा. निवडणुका निर्भय, भयमुक्त, नि:पक्ष वातावरणात निवडणूक पार पाडण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कामे करावीत, असेही श्रीमती. द्विवेदी म्हणाल्या.

श्री. अरगुंडे म्हणाले, निवडणुकीत मतदारांना प्रभावित करण्यासाठीच्या रोकड, मद्य, तसेच प्रतिबंधित पदार्थांच्या वाहतुकीस प्रतिबंध करावा, अशा घटनांवर विशेष लक्ष ठेऊन कारवाई करावी. आचारसंहिता भंगाबाबत घटनांवर लक्ष द्यावे. निवडणुकीतील गैरप्रकारांची माहिती घ्यावी, सी-व्हिजिल आणि नियंत्रण कक्षाकडे आलेल्या तक्रारींवर तात्काळ कारवाई करावी. राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाईमध्ये सातत्य ठेवावे. आवश्यकता भासल्यास पथके वाढवावी. कारवाईच्या अनुषंगाने आवश्यतेनुसार सर्व कागदपत्रे सोबत ठेवावी, असे श्री. अरगुंडे म्हणाले. श्रीमती चंद्राकर म्हणाल्या, मतदारांना मतदानाच्या दिवशी घराबाहेर पडण्यासाठी प्रोत्साहित करावे. स्वीप उपक्रमांअंतर्गत विविध यशस्वी उपक्रम राबवावेत.




# स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचा संजोग वाघेरेंना जाहीर पाठिंबा

पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघात स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाच्या वतीने शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना पाठिंबा जाहीर केला आहे. स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांची भेट घेऊन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे मावळ लोकसभा मतदार संघ व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.

महेश साळुंखे यांनी आपल्या पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यासोबत शिरीष घरत यांची भेट घेत पाठिंब्याचे पत्र दिले. शिवसेना तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, महानगर समन्वयक दीपक घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

# अखेर आरटीईच्या नियमांना उच्च न्यायालयात आव्हान..!

**पुणे । प्रतिनिधी**

सरकारच्या बदललेल्या आरटीई नियमांमुळे इंग्रजी माध्यमांच्या खासगी शाळेत आरटीई अंतर्गत प्रवेशाची वाट कठीण झाली असून, पालकांत मोठ्या प्रमाणात संतापाचे वातावरण दिसते. महाराष्ट्र सरकारच्या या नव्या आरटीई नियमांना उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. ज्येष्ठ वकील ॲड. जयना कोठारी, ॲड. दीपक चटप, ॲड. पायल गायकवाड, ॲड. ऋषीकेश भोयर यांच्या माध्यमातून शिक्षण हक्कांवर काम करणार्या संस्था व कार्यकर्त्यांनी जनहित याचिका दाखल केली आहे. त्यावर उच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या शिक्षण विभागाला नोटीस बजावली असून, ८ मे पर्यंत उत्तर सादर करण्यास सांगितले आहे.



आरटीईअंतर्गत वंचित, दुर्बल, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांतील विद्यार्थ्यांना २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश दिले जातात. शालेय शिक्षण विभागाने यंदा आरटीई प्रवेश प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल केला आहे. त्यानुसार विद्यार्थ्याच्या निवास-स्थानापासून एक किलोमीटरपर्यंतच्या अनुदानित शाळा, शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेत प्रवेश देण्यात येणार आहे. यातील उपलब्ध शाळा नसल्यास स्वयंअर्थसाहाय्यित खासगी शाळेत प्रवेश दिला जाणार आहे. नुकतेच आरटीईचे ऑनलाइन अर्ज सुरू झाले आहेत. या नियमांची अंमलबजावणी झाल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे.

राज्य सरकारचे नवे नियम बेकायदेशीर व अन्यायकारक असल्याचे मत याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. दीपक चटप यांनी मांडले. आरटीईतील बदलांमुळे बहुतांश इंग्रजी माध्यमांच्या विनाअनुदानित खासगी शाळेत प्रवेश मिळणार नसल्याने गरीब विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित राहावे लागेल, असे मत याचिकाकर्ते शिक्षण हक्क कार्यकर्ते वैभव एडके, राहुल शेंडे, वैभव कांबळे, अनिकेत कुत्तरमारे यांनी व्यक्त केले आहे.

# पुणे पोलिसांकडून ४२ पिस्तुल, ७४ जिवंत काडतुसे जप्त; २८ गुन्हेगार गजाआड

**पुणे । प्रतिनिधी**

पोलिसांच्या गुन्हे शाखा आणि १४ पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी बेकायदेशीर रित्या शस्त्र बाळगणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी मोहीम राभवली होती. या मोहिमेंतर्गत पोलिसांनी कारवाई करुन ४२ पिस्तुले ७४ जिवंत काडतुसे असा एकूण १२ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी २८ आरोपींना अटक केली आहे.




गुन्हे शाखा युनिट ३ च्या पथकाने २१ मार्च रोजी केलेल्या कारवाईत प्रशांत मगम पवार (वय-२८ रा. सिंहगड रोड) याच्याकडून १ पिस्टल व २ काडतुसे व १ किया कंपनीची कार जप्त केली. तर मेघराज उर्फ पप्पु लक्ष्मण दराडे (वय-३२ रा. अहमदनगर) याच्याकडून ४ पिस्टल व १० काडतुसे, समीर हरिभाऊ हरपुडे (वय-३२ रा. कोथरुड) याच्याकडून १ पिस्टल असा एकूण १९ लाख ४७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सादर आरोपींवर यापूर्वी अपहरण, खंडणी, दरोडा असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. तसेच १४ एप्रिल रोजी केलेल्या कारवाईत तडीपार असलेला गुन्हेगार नाव निखील राजु शिरसाठ (वय-२१ रा. धायरी) याला अटक करुन ६ पिस्टल, १० कडतुसे, मोपेड, कोयता असा एकूण २ लाख ८० हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. १५ एप्रिल रोजी केलेल्या कारवाईत तडीपार गुन्हेगार अश्विन बाळकृष्ण लोणारे (वय-२० रा. धाडरी) याला अटक करुन ३ पिस्टल ६ काडतुसे जप्त केली. तर वैभव अनंता तरडे (वय-२३ रा. धायरी) याच्याकडून ३ पिस्टल ६ काडतुसे असा एकूण २ लाख ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. २२ मार्च रोजी खंडणी विरोधी पथकाने सुरज रोहिदास खंडागळे (वय-३० रा. वारजे) याला अटक करुन १ पिस्टल व २ काडतुसे असा एकूण ३० हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तर २९ मार्च रोजी केलेल्या कारवाईत सागर गणेश सुतार (वय-२३ रा. वारजे) याला अटक करुन १ पिस्टल व २ काडतुसे असा एकूण ३० हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

१ एप्रिल रोजी खंडणी विरोधी पथक २ ने तीन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेऊन ५ पिस्टल ११ काडतुसे जप्त केली. तसेच ९ एप्रिल रोजी अजय उर्फ भज्या प्रकाश निकाळजे (वय-३१ रा. कोंढवा बुद्रुक) याला अटक करुन १ पिस्टल, ३ काडतुस असा एकूण २६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. युनिट २ च्या पथकाने ४ एप्रिल रोजी ओमकार विनोद पवार (वय-२५ रा. अपर बिबवेवाडी) याला ताब्यात घेऊन १ पिस्टल व २ काडतुसे असा एकूण ५० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने ९ गुन्हे दाखल करुन १४ आरोपींकडून २८ पिस्टल व ५४ जिवंत काडतुसे जप्त करुन १० लाख ५ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तर १४ पोलीस स्टेशनने १० गुन्हे दाखल करुन १४ आरोपींना अटक करुन १४ पिस्टल २० काडतुसे असा एकूण २ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त प्रवीण पवार, अपर पोलीस आयुक्त गुन्हे शैलेश बलकवडे, पोलीस उपायुक्त गुन्हे अमोल झेंडे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे १ सुनिल तांबे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे -२ सतिस गोवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रताप मानकर, श्रीहरी बहीरट, क्रांतीकुमार पाटील, नंदकुमार बिडवई, गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार प्रदिप शितोळे, सुनिल पवार, सुरेंद्र जगदाळे, सचिन अहिवळे, कानिफनाथ कारखेले, महेंद्र कडू, संतोष क्षीरसागर, विजय कांबळे, प्रफुल्ल चव्हाण, विनोद शिवले, अकबर शेख, उज्ज्वल मोकाशी यांच्यासह व १४ पोलीस ठाण्यातील अधिकारी वर पोलीस अंमलदार यांनी केली.

# अजित पवार पन्नास टक्के खोटे बोलतात: रोहित पवार

**पुणे । प्रतिनिधी**

मी जिल्हा परिषदेची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला होता. मला राजकारण करायचे होते म्हणून मी जिल्हा परिषदेसाठी आग्रही होतो. राज्यातील सर्व एबी फॉर्म देण्याची जबाबदारी ही अजित पवार यांच्यावर होती. त्यामुळे त्यांनी मला एबी फॉर्म दिला होता. मात्र, मी कधी अपक्ष निवडणूक लढणार नव्हतो. सध्या दादा ५० टक्के खरे आणि ५० टक्के खोटे बोलत आहेत. पूर्वी ते शंभर टक्के खरे बोलत असायचे. मात्र, भाजपच्या प्रभावामुळे आता ते ५० टक्क्यांवर आल्याची टीका आमदार रोहित पवार यांनी केली.

पुण्यात पत्रकारांशी संवाद साधताना पवार बोलत होते. बारामती लोकसभा मतदारसंघात प्रचार सभेत भाषण करताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आमदार रोहित पवार यांना तिकीट देण्यासाठी शरद पवारांचा विरोध असताना



देखील मी त्यांना एबी फॉर्म दिला, असा दावा केला होता. अजित पवारांच्या या दाव्यावर आता रोहित पवार यांनीच समाचार घेतला.

उपमुख्यमंत्री अजित पवार खोटे बोलत असून, दहा दिवसांनंतर अजित पवार यांचे भाषण पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहांसारखे होईल. कारण, भाजप एक व्हायरस आहे आणि हा व्हायरस अजित पवारांना लागला, तर भविष्यात त्यांना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागेल, असे रोहित पवार म्हणाले.

# कवी कलश यांच्या ग्रंथाचे लवकरच प्रकाशन

**पुणे । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज यांचे मित्र आणि मंत्रिमंडळातील मंत्री कवी कलश यांचे दुर्मिळ व अप्रकाशित काव्य ‘चंद कंवर री बात’ यावर ग्रंथ लिहिण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. सध्या याचे भाषांतर करण्याचे काम सुरू आहे. येत्या दोन ते तीन महिन्यांत हे काम पूर्ण होणार असून लवकरच मराठी वाचकांना कवी कलश यांचे दुर्मिळ काव्य ग्रंथातून उपलब्ध होणार असल्याची माहिती इतिहास अभ्यासक व लेखक सुशांत उदावंत यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

इतिहासात कवी कलश यांच्याविषयी तसेच त्यांच्या साहित्याविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. गेल्या काही वर्षांपासून कवी कलश यांच्या साहित्यावर संशोधन सुरू आहे. १९६०च्या दशकात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. कृष्ण दिवाकर यांनी लिहलेल्या ग्रंथात कवी कलश यांच्याविषयी थोडे लिखाण झाले आहे. अधिक शोध घेतला असता या ग्रंथाचे हस्तलिखित राजस्थानमधील प्राच्यविद्या प्रतिष्ठान येथे असल्याची माहिती मिळाली. तेव्हा राजस्थान येथील प्राच्यविद्या प्रतिष्ठानमध्ये जाऊन त्या ग्रंथाची ‘स्कॅन कॉपी’ मिळविली. त्याआधारे हा ग्रंथ लिहिला असल्याचे सुशांत उदावंत यांनी सांगितले.

# महामानव विश्वकाव्य दर्शन काव्यसंग्रह निर्मितीसाठी साहित्य पाठविण्याचे बार्टीकडून आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर ‘महामानव विश्वकाव्य दर्शन काव्यसंग्रह’ निर्मितीसाठी विविध भाषेतील साहित्यकारांनी त्यांचे काव्यरूपातील साहित्य ३१ मे पर्यंत पाठविण्याचे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (बार्टी) महासंचालक सुनिल वारे यांनी केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव ज्याप्रमाणे सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रावर पडला तसाच तो साहित्य क्षेत्रावरही मोठ्या प्रमाणावर पडला. प्रारंभिक काळात राज्यातील साहित्यिकांनी कविता, कथा, नाटक, आत्मचरित्र इत्यादी लेखन प्रकारातून विपुल प्रमाणात साहित्यनिर्मिती केली आहे. त्याचबरोबर इतर भाषिक राज्यातही विविध भाषा तसेच बोलीभाषेमध्ये देखील अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात साहित्यनिर्मिती झाली आहे. हे विचार जनसामान्य माणसापर्यंत पोहचविण्यात कवी, गायक, शाहीर, साहित्यिक, कलावंतांचे मोठे योगदान आहे.

या सर्वांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांनी लिहिलेल्या कविता, गझल, अभंग, अखंड, ओवी, छक्कड, शाहिरी, रुबाया, हायकू, चारोळी, भारुड, पोवाडा, लोकगीते इत्यादी सर्व काव्यप्रकार मोठ्या प्रमाणावर संकलन व एकत्रित करून ‘महामानव विश्वकाव्य दर्शन’ हा काव्यसंग्रह संपादित करून ग्रंथरूपाने प्रकाशित करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी साहित्यकारांनी विविध भाषेतील काव्य निर्माण केलेले असल्यास त्याची प्रत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी), २८ क्वीन्स गार्डन, पुणे ४११००१ या पत्यावर किंवा . या ई-मेलवर किंवा ९४०४९९९४५२ व्हॉट्सॲप क्रमांकावर ३१ मे पर्यंत पाठवावी. या कविता साहित्यिकाच्या नावाने प्रसिद्ध करण्यात येईल. सर्वांनी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहनही बार्टीमार्फत करण्यात आले आहे.

# सोनिटिक्स क्रिप्टोकरन्सीच्या नावाखाली एक कोटीची फसवणूक, पुणे सायबर पोलिसांकडून वकिलाला अटक

अभासी चलनात (क्रिप्टोकरन्सी ) गुंतवणूक केल्यास २० टक्के परतावा देण्याच्या आमिषाने एक कोटी १० लाखांची फसवणूक करणाऱ्या आरोपीला पुणे सायबर पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणात अटकपूर्व जामीन फेटाळल्यानंतर आरोपी पसार झाला होता. अखेर सायबर पोलिसांना त्याला अटक करण्यात यश आले आहे. वकिल संतोष पोपट थोरात (रा. खराडी, पुणे) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. या गुन्ह्याची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यात पोलिसांनी वर्तवली आहे.

संतोष थोरात याने सोनिटिक्स नावाचे अभासी चलन तयार करुन त्यामध्ये गुंतवणूक केल्यास वार्षीक २० टक्के परतावा देण्याचे आमिष नागरिकांना दाखवले. गुंतवणुकीच्या अनेक पटीमध्ये परतावा मिळण्याच्या अपेक्षेने फिर्यादीसह तक्रारदारांकडून १ कोटी १० लाख रुपये गुंतवले होते. मात्र, आरोपीने कोणत्याही प्रकारचा मोबदला न देता फसवणूक केली. या प्रकरणी चतु:शृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी संतोष थोरात याने अटकपुर्व जामीन मिळविण्यासाठी अर्ज केला होता. मात्र, न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळून लावला. आरोपीने पोलिसांना गुंगारा देण्यासाठी मोबाईल क्रमांक बदलला. राहण्याचे ठिकाण वेळोवेळी बदलले. सायबर पोलिसांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषणावरुन त्याचा माग काढून त्याला बेड्या ठोकल्या. आरोपीला वाघोली परिसरातून अटक करण्यात आली. त्याच्याकडून दोन मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.

फसवणूक झालेल्यांनी सायबर विभागात तक्रार द्यावी

अभासी चलनात गुंतवणुकीच्या आमिषाने फसवणूक झालेल्या नागरिकांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार करावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. सोनिटिक्स नावाचे अभासी चलनामध्ये ज्या-ज्या लोकांनी गुंतवणूक केली आहे त्यांनी शिवाजीनगर येथील सायबर पोलीस ठाण्यात यावे असेही आवाहन पोलिसांनी केले आहे.

ही कारवाई पोलीस उपायुक्त विक्रांत देशमुख, सहायक पोलीस आयुक्त आर.एन. राजे यांच्या मार्गदर्शनासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक मीनल सुपे-पाटील, संदीप मुंढे, संदीप पवार, दिनेश मरकड यांच्या पथकाने केली.

# आधी बलात्कार नंतर काढले व्हिडीओ

## महिलेला ब्लॅकमेल करुन दहा लाखांची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

दोघांनी एका महिलेवर बलात्कार केला. त्यानंतर त्याचे व्हिडीओ चित्रीकरण केले. पुढे तेच व्हिडीओ महिलेला पाठवून बदनामी करण्याच्या धमकीने दहा लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी केतन महादेव चौघुले (वय ३३, रा. मु. पो. कागल, ता. कागल, जि. कोल्हापूर), शेखर (पूर्ण नाव पत्ता माहीत नाही) या दोघांविरुद्ध बलात्कार, खंडणी, धमकी, माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

यातील केतन याला पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत कॅम्प परिसरात राहणार्या ३४ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. ही घटना डिसेंबर २०२३ ते २२ एप्रिल २०२४ या कालावधीत महिलेचे राहते घर, शिवाजीनगर, नर्हे परिसरात घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला विवाहित आहे. मात्र, पतीपासून विभक्त राहते. ती सरकारी नोकरी करते. इन्स्टाग्रामच्या माध्यमातून महिलेची आरोपी केतन याच्यासोबत ओळख झाली होती. त्यातून दोघांचा संपर्क वाढत गेला. केतनने महिलेसोबत विविध हॉटेलमध्ये जबरदस्तीने शरीरसंबंध प्रस्थापित केले. त्यानंतर त्याने मित्र शेखर याच्यासोबत देखील महिलेला जबरदस्तीने शरीरसंबंध ठेवण्यास सांगितले. दरम्यान, केतनने नकळत याचे चित्रीकरण करून व्हिडीओ तयार केले. त्यानंतर दोघांनी फोन करून महिलेकडे दहा लाख रुपये खंडणीची मागणी केली.

दरम्यान, महिलेने पैसे देण्यास नकार दिला. त्या वेळी केतनने महिलेला तुझे व्हिडीओ व्हायरल करून बदनामी करेन, अशी धमकी दिली तसेच शिवीगाळ केली. फिर्यादी काम करत असलेल्या नोकरीच्या ठिकाणी जाऊन केतनने ते व्हिडीओ महिलेच्या मोबाईलवर पाठविले. तसेच हे व्हिडीओ तिच्या कार्यालयातील एका कर्मचार्याच्या मोबाईलवर पाठविण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. हा प्रकार घडल्यानंतर महिलेने शिवाजीनगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पुढील तपास शिवाजीनगर पोलिस करत आहेत.